सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on


E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ९ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## सर्वच १२ झेडपीत सत्ताधारी महायुतीचा डंका, महाविकास आघाडीची हाराकिरी

### दिग्गजांना बसला पराभवाचा धक्का

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९पुणे**




महाराष्ट्रातील १२ जिल्हापरिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी झालेल्या निवडणुकांचे निकाल हाती येण्यास सुरुवात झाली आहे. राज्यात भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला असून भाजपाने १ वाजेपर्यंत आलेल्या आकडेवारीनुसार, जिल्हा परिषदेत १७६ जागांवर विजय मिळवला आहे, तर शिवसेनेने १०९ जागांवर विजय मिळवला आहे, राज्यातील निकाल अजूनही समोर येत आहेत.

पुणे जिल्हा परिषद निवडणुकीत अजितदादांचे स्वप्न झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. जिल्ह्यात ७३ जागांपैकी तब्बल ४३ जागांवर विजय मिळवत अजितदादांच्या राष्ट्रवादीने एकहाती सत्ता मिळवली आहे. तर इतर पक्षांनी एक आकडी जागेवर आहेत. काँग्रेस तर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत जागा मिळवण्यात अपयशी ठरले असून त्यांना भोपळ्यावर समाधान मानावे लागले आहे.

पुणे जिल्हा परिषद निवडणुकीसाठी पुण्यात एकहाती सत्ता मिळवण्याचे अजित पवारांचे स्वप्न अखेर पूर्ण झाले आहे. भाजपला ८ जागेवर समाधान मिळवावे लागले आहे. शिवसेना ५ उद्धवसेना ७ आणि शरद पवार पक्षाला १ जागा मिळाली आहे. २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत एकसंध राष्ट्रवादी काँग्रेसने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले होते. त्यात ७५ गटांपैकी ४४ गटांत विजय मिळवत पक्षाने एकहाती सत्ता मिळवली होती. त्याखालोखाल शिवसेनेने १३ जागांवर विजय मिळवला होता. भाजप आणि काँग्रेसला प्रत्येकी ७ जागा मिळाल्या होत्या, तर अपक्ष आणि इतर पक्षांना मिळून ४ जागांवर यश मिळाले होते. मात्र यंदाही पुन्हा पुण्यात घड्याळच दिसत आहे.

**जिल्ह्यात राष्ट्रवादीचे सर्वाधिक आमदार**

पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादीचे सर्वधिक आमदार आहेत. त्यांचा फायदा या जिल्हा प्रदशड निवडणुकीत झाल्याचे दिसून आले आहे. मावळ भागातही राष्ट्रवादीने भाजपच्या जागा खेचून आणत एकहाती सत्ता मिळवली आहे. जिल्ह्यात अजितदादांनी अनेक विकासकामे केली होती. त्यामुळे मतदारांनी घड्याळाला साथ देत राष्ट्रवादीला सत्ता मिळवून दिली आहे.

## आजचा विजय मोदींच्या योजनांचा आणि देवेंद्रजींच्या संवेदनशीलतेचा

### अजितदादांच्या निधनामुळे जल्लोष टाळला - भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या निकालांचे कल स्पष्ट होताच महायुतीमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे या विजयाचा कोणताही जल्लोष न करण्याचा निर्णय भाजपने घेतला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी अजितदादांच्या निधनानंतर सर्व कार्यकर्त्यांना मिरवणुका आणि मोठे सोहळे टाळण्याच्या सूचना दिल्या होत्या, अशी माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज दिली. फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वामुळेच कार्यकर्त्यांनी ही निवडणूक केवळ संघटनात्मक पातळीवर आणि 'बूथ' स्तरावर लढवली, असेही त्यांनी नमूद केले.



रवींद्र चव्हाण यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करताना सांगितले की, फडणवीस प्रत्येक निवडणुकीसाठी अहोरात्र कष्ट घेतात. अजितदादांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी कार्यकर्त्यांना आदेश दिले होते की, मोठ्या प्रचारसभा किंवा शक्तीप्रदर्शन करू नका. ही निवडणूक शांततेत आणि संघटनात्मकदृष्ट्या सूक्ष्म स्तरावर लढा. त्यांच्या या संवेदनशील निर्णयाचा आम्ही सर्वांनी आदर केला आणि निकालांनी हे सिद्ध केले की जनतेला आमची कार्यपद्धती मान्य आहे, असे चव्हाण म्हणाले.

**पंतप्रधान मोदींच्या ११ वर्षांच्या कार्याची पावती**


या विजयाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या कारकिर्दीला देताना रवींद्र चव्हाण म्हणाले की, गेल्या ११ वर्षांत मोदींनी शेतकरी, कष्टकरी आणि शहरी तसेच ग्रामीण भागातील प्रत्येक वर्गाच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी अनेक योजना राबवल्या. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दिवंगत अजित पवार यांनी गेल्या तीन वर्षांत ज्या ताकदीने काम केले, त्याचीच ही फलश्रुती आहे

## विरोधक लोकसभा अध्यक्षांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणण्याची शक्यता

### विरोधी खासदारांचा आजही गदारोळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नवी दिल्ली**

वृत्तसंस्था आयएएनएसने दिलेल्या माहितीनुसार, विरोधी पक्ष लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणू शकतात. तत्पूर्वी, सोमवार, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या नवव्या दिवशी गदारोळ सुरू झाला. विरोधकांनी राहुल गांधींना बोलण्याची परवानगी देण्याची मागणी केली. लोकसभा अध्यक्षांनी त्यांना प्रश्नोत्तराच्या तासानंतर त्यांचे विचार मांडण्याचे निर्देश दिले. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी नकार दिला आणि गदारोळ सुरूच ठेवला.



त्यानंतर लोकसभा अध्यक्षांनी संसद दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केली. यापूर्वी, अधिवेशन दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले होते. शुक्रवारी, अधिवेशनाच्या आठव्या दिवशी, व्यापक गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज तीन वेळा तहकूब करण्यात आले. सोमवारी राज्यसभेतही गदारोळ होण्याची शक्यता आहे.

शुक्रवारी राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे आणि केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यात राज्यमंत्री रवनीत सिंह बिट्टू यांच्यावरून जोरदार वाद झाला.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी बिट्टू काँग्रेस सोडून भाजपमध्ये सामील झाले. यापूर्वी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेच्या आवारात त्यांना देशद्रोही म्हटले होते, ज्यामुळे वाद निर्माण झाला होता.

## पुण्याच्या महापौरपदी मंजुषा नागपुरे उपमहापौरपदी परशुराम वाडेकर

### मनपा सभागृहात पार पडली निवडणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९पुणे**

पुणे महानगरपालिकेत सोमवारी मनपा सभागृहात महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक पार पडली जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून यावेळी काम पाहिले. भारतीय जनता पक्षाच्या मंजुषा नागपुरे यांची महापौर पदी बिनविरोध निवड तर उपमहापौरपदी परशुराम वाडेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आलेली आहे.

तीन सदस्य यांनी पुणे मनपा महापौर पदासाठी अर्ज दाखल केले होते. भारतीय जनता पक्षाकडून मंजुषा नागपुरे, राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाकडून शितल सावंत तर काँग्रेसकडून अश्विनी लांडगे यांनी उमेदवारी अर्ज महापौर



पदासाठी दाखल केला होता. त्यापैकी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शीतल अजय सावंत आणि काँग्रेसकडून अश्विनी लांडगे यांनी त्यांची नावे १५ मिनिटांच्या माघारी वेळेत मागे घेतली आहे. भारतीय जनता पक्षाचे गटनेते गणेश बिडकर यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेत्यांशी चर्चा करून संबंधित निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी शिष्टाई केली आणि ती फळाला आली. त्यानंतर मंजुषा नागपुरे यांची महापौरपदी बिनविरोध निवड करण्यात आली. त्यानंतर सभागृहात उपस्थित सदस्यांनी त्यांचे स्वागत केले.


उपमहापौर पदासाठी तीन जणांनी सहा अर्ज दाखल केले होते. त्यापैकी अर्ज माघारी मुदतीत अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. उपमहापौर पदासाठी काँग्रेस पक्षाकडून साहिल केदारी यांनी दोन अर्ज दाखल केले. भाजपकडून परशुराम वाडेकर यांनी देखील तीन अर्ज दाखल केले. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून दत्ता बहिरट यांनी अर्ज दाखल केले होते. संबंधित अर्ज माघारी घेण्यासाठी १५ मिनिटांचा वेळ देण्यात आला. त्यामध्ये पुन्हा एकदा भाजप गटनेते गणेश बिडकर यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेत्यांशी चर्चा केली. अखेर उपमहापौरपदी साहिल केदारी आणि दत्ता बहिरट यांनी अर्ज माघारी घेतला. त्यानंतर परशुराम वाडेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी आणि मनपा आयुक्त नवल किशोर राम यांनी नियुक्तीचे पत्र त्यांना दिले.

## शरद पवारांची तब्येत बिघडली पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात उपचार

### सततच्या दगदगीमुळे खोकल्याचा त्रास वाढल्याची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९पुणे**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची प्रकृती आज अचानक बिघडली आहे. त्यांना तातडीने बारामतीहून पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले आहे. तिथे त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीखाली उपचार सुरू आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर शरद पवारांची प्रकृती काहीशी ढासळली होती. त्यामुळे ते आज अजित पवारांच्या तेराव्याच्या कार्यक्रमातही सहभागी झाले नव्हते. पण तब्येत फारशी



सुधारणा न झाल्यामुळे त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या भीषण विमान अपघातात निधन झाले होते. त्याचा मोठा धक्का शरद पवारांसह त्यांच्या कुटुंबीयांना बसला होता. अजित पवार यांच्या निधनानंतर शरद पवार सातत्याने श्रद्धांजली कार्यक्रम व भेटीगाठींमध्ये व्यस्त होते. यामुळे त्यांची दगदग वाढली होती. त्यातच गत काही दिवसांपासून प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांनी सार्वजनिक कार्यक्रम टाळले होते. आज अजित पवार यांच्या तेराव्याच्या कार्यक्रमालाही ते उपस्थित राहू शकले नाही. त्यांनी घरीच विश्रांती घेणे पसंत केले होते. पण त्यानंतरही प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने अखेर डॉक्टरांच्या सल्लानुसार त्यांना पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात हलण्याचा निर्णय घेण्यात आला.

## गडकरी म्हणाले, आता वाघांची नसबंदी करण्याशिवाय पर्याय नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर**

वाघांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी रासायनिक गर्भनिरोधकांचा वापर करण्याचा विचार राज्य शासनाने पुन्हा सुरू केल्याच्या चर्चेने वन्यजीवक्षेत्रात गदारोळ निर्माण झाला आहे. ३ जानेवारी रोजी मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या बैठकीच्या टिप्पणीत या विषयाचा उल्लेख आल्यानंतर पुन्हा एकदा चर्चेला सुरुवात झाली आहे. त्यानंतर आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी वाढत्या वाघांच्या संख्येवर महत्त्वाचे विधान केले आहे. वाघ पाहण्यासाठी संपूर्ण जगातील लोक विदर्भात येत आहेत. पण आता वाढती वाघांची संख्या ही एक समस्या झाली आहे.



वाघांची वाढती संख्या आता गरजेपेक्षा जास्त आहे. यामुळे लोकांच्या जगण्या मरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. वाघ आता गावांमध्ये यायला लागल्याने लोकांचा जीव धोक्यात आला आहे. गावापर्यंत वाघ यायला लागले. त्यामुळे मानव आणि वन्यजीव संघर्ष वाढत चालला आहे. अशा प्रकारच्या वाघांची संख्या नियंत्रित करण्यासाठी नसबंदीसारखे उपाय विचार करण्याची गरज आहे, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित तिसऱ्या ड्व्हांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या समारोपीय सत्रात गडकरी बोलत होते. यावेळी राजकारण हे सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे साधन आहे. त्यामुळे आमदार, खासदार आणि मंत्री हे जनतेला उत्तरदायी आहेत. त्यामुळे जनतेचे सर्वांगीण विकास करणे हीच आपली भूमिका राहायला हवी.

विदर्भाचा भूतकाळ हा शेतकरी आत्महत्या, कुपोषणाचा होता. हे आव्हान बदलायचे असतील तर 'खासदार औद्योगिक महोत्सवा'सारख्या उपक्रमांची गरज आहे. या माध्यमातून आज जगातील कंपन्या आपल्याकडे येत आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

## एकनाथ शिंदे अथक परिश्रम घेतायत! पंतप्रधान मोदींच्या एकनाथ शिंदेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ९ मुंबई**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांचा आज (९ फेब्रुवारी) वाढदिवस आहे. यानिमित्ताने शिंदे यांनी देशभरातून राजकीय क्षेत्रातील अनेक नेत्यांनी शुभेच्छा दिल्या जात आहे. इतकेच नाही तर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील सोशल मीडियावर यानिमीत्ताने पोस्ट केली आहे.

पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर पोस्ट करत एकनाथ शिंदे यांचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या आहेत. ते म्हणाले की, एकनाथजी शिंदे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा. ते महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि पूज्य बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत. त्यांच्या दीर्घायुष्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी प्रार्थना करतो.

दरम्यान या शुभेच्छांनंतर एकनाथ शिंदे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पंतप्रधान मोदींचे आभार मानले आहेत.

आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी, वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्याबद्दल मी आपला खूप आभारी आहे. आपले स्नेहपूर्ण शब्द आणि आशीर्वाद आम्हा सर्वांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहेत. आपल्या दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाखाली भारत वेगाने प्रगती करत आहे आणि महाराष्ट्रातही आम्ही आपण दाखवलेल्या विकासाच्या मार्गावर पूर्ण वचनबद्धतेने पुढे जात आहोत. देशाबद्दल आपले समर्पण आणि महाराष्ट्राच्या जनतेप्रती असलेली आपली आत्मीयता आम्हाला निरंतर प्रेरणा देत राहील.

## सोशल मीडियावर लाखो फॉलोअर्स असणाऱ्या रिल्स स्टार निर्मला नवले पराभूत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९शिरूर**

शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक चर्चेचा विषय ठरत आहे. कारण कारेगावच्या माजी सरपंच निर्मला नवले यांचा निवडणुकीत पराभव झाला. त्यांच्या विरोधात लढलेल्या भाजपच्या मनीषा पाचंगे यांनी सुमारे २,७०० मतांच्या फरकाने विजय मिळवला.

निर्मला नवले या गेल्या काही वर्षांत सोशल मीडियामुळे मोठ्या प्रमाणावर चर्चेत होत्या. त्यांच्या व्हिडिओंना लाखो व्ह्यूज मिळत होते. प्रचाराच्या काळात त्यांच्या सभांनाही मोठी गर्दी जमायची. त्यामुळे त्या सहज जिंकतील,



असा अंदाज अनेकांनी बांधला होता. मात्र प्रत्यक्ष मतदानात मतदारांनी वेगळाच निर्णय घेतला.

सोशल मीडियावर लोकप्रियता असली, तरी निवडणूक जिंकण्यासाठी जमिनीवरचं काम अधिक महत्त्वाचं ठरतं. मनीषा पाचंगे यांनी प्रचाराच्या काळात सातत्याने घराघरात भेटी दिल्या, स्थानिक प्रश्न ऐकून घेतले आणि मतदारांशी थेट संवाद साधला. त्यांच्या या नियोजित आणि शांत प्रचाराचा फायदा अखेरीस निकालात दिसून आला.दुसरीकडे, निर्मला नवले यांची ओळख प्रामुख्याने डिजिटल माध्यमांपुरती मर्यादित राहिली, अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू आहे. सभांमधील गर्दी आणि सोशल मीडियावरील प्रतिसाद असूनही प्रत्यक्ष लोकांनी त्यांना मतदान केलं नाही.

## भाजपाचा उमेदवार अवघ्या दोन मतांनी पराभूत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ९ लातुर**

राज्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भाजपा हा क्रमांक एकच पक्ष ठरला. बहुतांश जिल्हा परिषदांवर भाजपाने स्वबळावर बहुमत मिळवले. त्यापाठोपाठ शिंदे गट व अजित पवार यांच्या राष्ट्रवादीनेही चांगल्या जागा आपल्या पदरात पाडून घेतल्या. दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटासह काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पराभवाचा फटका बसला. यादरम्यान लातूरच्या रेणापूर तालुक्यातील कामखेडा जिल्हा परिषद निवडणुकीत दोन जावांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. कार्यकर्त्यांचा श्वास रोखून धरणाऱ्या या लढतीत अखेर काँग्रेसच्या उमेदवार आशाताई भिसे यांनी त्याच्याच जावेचा अवघ्या दोन मतांनी पराभव केला.

काँग्रेसचा पारंपारिक बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लातूरमधील जिल्हा परिषदेच्या ५९ पैकी ५२ जागांचे निकाल हाती आले. या निवडणुकीत काँग्रेसने १९ जागा जिंकल्या असून भाजपाला १७ जागांवर विजय मिळवला. त्याशिवाय दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला १० जागा मिळाल्या.

संपादकीय ......

# पारदर्शकता वाढवणारा निर्णय

जमिनीच्या संपादनाचा अंतिम निवाडा, भरपाईची रक्कम जिल्हाधिकार्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक केले आहे. जमिनीचा नेमका किती मोबदला मंजूर झाला, ही माहिती घरी बसून मिळेल.

भूसंपादन ही कोणत्याही राष्ट्राच्या विकास प्रक्रियेतील अत्यंत पायाभूत आणि तितकीच संवेदनशील बाब मानली जाते. रस्ते, रेल्वे, धरणे, औद्योगिक वसाहती आणि नागरी सुविधांच्या उभारणीसाठी जमिनीची आवश्यकता असते आणि ही जमीन बहुतांश वेळा शेतकर्यांकडून किंवा खासगी मालकांकडून घेतली जाते. ताज्या निर्णयानुसार, आता भूसंपादनाचा अंतिम निवाडा आणि भरपाईची रक्कम जिल्हाधिकार्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक झाले आहे. हा निर्णय केवळ प्रशासकीय सुधारणा नसून, तो पारदर्शकतेच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

भारतामध्ये दीर्घकाळ १८९४ चा भूसंपादन कायदा अस्तित्वात होता. या कायद्याचा मुख्य उद्देश हा वसाहतवादी शासनाला हव्या असलेल्या प्रकल्पांसाठी सक्तीने जमीन अधिग्रहित करणे हा होता. २०१३ मध्ये केंद्र सरकारने ‘भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित मोबदला मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क कायदा’ संमत केला. या कायद्याने भूसंपादनाच्या प्रक्रियेत मानवी चेहरा आणण्याचा प्रयत्न केला. जमिनीच्या मोबदल्यात भरघोस वाढ, सामाजिक परिणामांचे मूल्यांकन आणि बाधित लोकांच्या संमतीला महत्त्व अशा तरतुदी यामध्ये करण्यात आल्या. महाराष्ट्रातही या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली; मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना स्थानिक पातळीवर अनेक अडचणी येत होत्या. शेतकर्यांना आपल्या जमिनीचा निवाडा किती झाला, त्याला किती पैसे मिळणार आणि त्याच्या जमिनीचा ताबा कधी घेतला जाणार, या माहितीसाठी तहसील किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असत. ज्यामुळे भ्रष्टाचाराला वाव मिळायचा.

भूसंपादनातील समस्यांचा विचार केल्यास माहितीचा अभाव ही सर्वात मोठी समस्या ठरते. एखादा प्रकल्प जाहीर होतो, तेव्हा दलाल आणि मध्यस्थ सक्रिय होतात. सरकारी दप्तरी होणारा विलंब आणि सातबारा उतार्यावर वेळेत नोंदी न होणे यामुळे कायदेशीर गुंतागुंत वाढते. अनेकदा भूसंपादन होऊनही कागदोपत्री मालकी बदलत नाही. त्यामुळे नंतरच्या काळात जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार होऊन फसवणुकीचे प्रकार घडतात. हरियाणा आणि तेलंगणासारख्या राज्यांनी भूसंपादनासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित केली. तिथे जमिनीच्या मालकांना थेट त्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्याचा संदेश मिळतो आणि सर्व कागदपत्रे सार्वजनिक उपलब्ध असतात. महाराष्ट्राने याच धर्तीवर पाऊल उचलले असून, जिल्हाधिकार्यांच्या संकेतस्थळावर सर्व निवाडे प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. आता कोणताही शेतकरी गावाच्या किंवा प्रकल्पाच्या नावानुसार शोध घेऊन आपल्या जमिनीचा निवाडा डाऊनलोड करू शकेल. त्याला नेमकी किती रक्कम मंजूर झाली आहे, हे घरी बसून मोबाईलवर पाहता येईल.

यामुळे सरकारी कार्यालयातील हेलपाटे थांबतील आणि मध्यस्थांची साखळी मोडीत निघेल. तसेच, जमिनीचा ताबा मिळाल्यानंतर सात दिवसांच्या आत निवाड्याची प्रत महसूल अधिकार्यांकडे पाठवणे बंधनकारक केल्यामुळे प्रशासकीय गतिमानता वाढेल. सरकारी मालकीची नोंद सातबारावर वेळेत झाल्यामुळे भविष्यातील वादांना पूर्णविराम मिळेल. विशेष म्हणजे, केवळ नवीनच नव्हे तर १८९४ च्या जुन्या कायद्यानुसार झालेल्या संपादनाचे उपलब्ध रेकॉर्डही स्कॅन करून संकेतस्थळावर टाकण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे भूसंपादनाचा एक डिजिटल इतिहास तयार होईल. ज्यांच्या जमिनी पिढ्यान् पिढ्या प्रकल्पांत गेल्या आहेत, त्यांना आपल्या हक्काची माहिती मिळवणे सोपे होईल. पारदर्शकतेमुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास वाढेल आणि विकास प्रकल्पांना होणारा विरोध कमी होण्यास मदत होईल. राज्याच्या महसूल व वन विभागाने घेतलेला हा निर्णय महसूल प्रशासनातील एक मोठी सुधारणा आहे. या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी झाल्यास भूसंपादन ही प्रक्रिया त्रासदायक न ठरता विकासाचे एक सुसह्य माध्यम बनेल, यात शंका नाही.

# बारमाही उत्पादन देणाऱ्या भुईमूग पिकाची लागवड करताना करा ’ह्या’ सुधारित तंत्राचा अवलंब




**दि ९ विदर्भ प्रजासत्ताक** भुईमूग हे तेलबिया पिकापैकी एक म्हत्वाचे पिक आहे. याची खरीप, रब्बी, उन्हाळी एकूणच बारमाही पीक म्हणून भुईमूग लागवड करता येते.

भुईमूग हे तेलबिया पिकापैकी एक महत्वाचे पिक आहे. याची खरीप, रब्बी, उन्हाळी एकूणच बारमाही पीक म्हणून भुईमूग लागवड करता येते.

**जमिन व मशागत**

त्यासाठी जमीन मध्यम ते भारी व चांगली निचरा होणारी निवडावी.

जमीन खोल नांगरून भुसभुशीत करावी.

शेवटच्या कुळवणीपूर्वी हेक्टरी पाच टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत मातीत मिसळून घ्यावे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**वाणांची निवड-** भुईमुगाची लागवड करताना सुधारित जातींचा वापर करावा.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातर्फे ’कोकण गौरव’, ’कोकण ट्रॉम्बे टपोरा’, ’कोकण भूरत्न’ या जाती विकसित करून प्रसारित केल्या आहेत.

श्च/ कोकणामध्ये या जाती खरीप तसेच रब्बी व उन्हाळी हंगामात लागवडीसाठी योग्य आहेत.

**बियाणे व बीजप्रक्रिया**

लागवडीसाठी उत्तम आणि दर्जेदार बियाण्याची निवड करावी. हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे.

मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी बियाणाला थायरम ३ ग्रॅम प्रतिकिलो या प्रमाणात चोळावे.

या व्यतिरिक्त २० ग्रॅम रायझोबियम आणि ५० ग्रॅम स्फूरद वापरून बीजप्रक्रिया करावी.

**लागवड पद्धती-** पेरणीपूर्व जमीन सपाट करून घ्यावी. आवश्यकता वाटल्यास पाण्याची एक पाळी द्यावी.

पेरणी टोकन पद्धतीने करावी.

उपट्या जातीची पेरणी दोन ओळीत ३० सेंटीमीटर अंतर ठेवून करावी.

निमपसऱ्या, पसऱ्या जातीसाठी दोन ओळीतील अंतर १० ते १५ सेंटीमीटर ठेवावे.

**प्लास्टिकचे आच्छादनाचा वापर**

कोकणात भुईमुगापासून अधिक उत्पादन व नफा मिळविण्यासाठी पिकाची लागवड रुंद वाफा व सरीवर ८० सेंटीमीटर बाय २० सेंटीमीटर अंतरावरून करून सात मायक्रॉन जाडीचे पारदर्शक प्लास्टिकचे आच्छादन करावे.तण नियंत्रणासाठी प्लास्टिक आच्छादन फायदेशीर ठरत आहे.

**पाणी व्यवस्थापन**

प्लास्टिक आच्छादनाचा वापर केल्यामुळे पिकास पाणी कमी लागते. त्यामुळे पाण्याच्या १ ते २ पाळ्या कमी लागतात.

पिकाच्या वाढीच्या कालावधीत दोन पाळ्यांतील अंतर १५ ते २० दिवस ठेवावे. मात्र, पीक फुलोऱ्यात असताना तसेच शेंगा भरण्याच्या वेळेस पाण्याच्या दोन पाळ्यांमधील अंतर १२ ते १५ दिवस असावे.त्यामुळे पिकाला ते ९ पाण्याच्या पाळ्या पुरेशा आहेत.

भुईमुगाच्या प्लास्टिक आच्छादन तत्रज्ञानाचा वापर करून हेक्टरी ४५ ते ५० क्विंटल उत्पादन मिळते.

# जेवणापेक्षा वेळ महत्त्वाची का?



**दि ९ विदर्भ प्रजासत्ताक**

पूर्वीपासून रात्री लवकर जेवावे, असे सांगितले गेले आहे. अनेक जण तर सूर्यास्तापूर्वीच जेवावे असे सांगताना आपण पाहिले आहेत. आता आधुनिक आरोग्यशास्त्रातही हीच बाब सांगितली जात आहे. तुमच्या




जेवणाच्या ताटापेक्षा आणि त्यातील पदार्थांच्या पौष्टिकतेपेक्षाही तुमच्या जेवणाची वेळ अधिक महत्त्वाची आहे.

जेव्हा आपण उशिरा जेवतो, तेव्हा शरीरातील इन्सुलिनची संवेदनशीलता ४० ते ५० टक्क्यांनी कमी होते, ज्यामुळे चरबी जाळण्याची प्रक्रिया मंदावते. रात्रीच्या वेळी शरीरातील मेलाटोनिन हे झोपेचे संप्रेरक वाढते, जे पचन प्रक्रियेत अडथळा आणू शकते. जेव्हा शरीराने स्वतःची अंतर्गत दुरुस्ती आणि विषमुक्त (डेटॉक्स) होण्याचे काम करायला हवे, तेव्हा शरीर अन्न पचवण्यात गुंतलेले असते. यामुळेच ८ तासांची झोप घेऊनही सकाळी उठल्यावर अनेकदा जडपणा, अपचन किंवा थकवा जाणवतो.

सूर्यास्तानंतर इन्सुलिनची कार्यक्षमता नैसर्गिकरीत्या कमी होत असल्याने, उशिरा केलेले जेवण शरीरात चरबी साठवण्यास मदत करते. संशोधनानुसार, जे लोक रात्री ७ वाजण्यापूर्वी जेवतात त्यांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण रात्रीच्या वेळी १५ टक्क्यांनी कमी राहते आणि त्यांची इन्सुलिन संवेदनशीलता अधिक चांगली असते. लवकर जेवल्यामुळे रात्री उशिरा अस्वस्थ वाटणे किंवा ॲसिडिटीचा त्रास होणे टाळता येते. रात्री ७ वाजता जेवल्यास साखरेची पातळी स्थिर राहते, तर रात्री साडेनऊनंतर जेवल्यास साखरेचे प्रमाण वाढते आणि शरीराच्या दुरुस्तीची प्रक्रिया मंदावते.

विशेषतः, मधुमेह (डायबिटीज), फॅटी लिव्हर किंवा साखरेचा त्रास असलेल्या लोकांसाठी लवकर जेवणे हा एक रामबाण उपाय आहे. उशिरा जेवल्यामुळे अशा रुग्णांच्या रक्तातील साखरेची पातळी ३० ते ५० टक्क्यांनी वाढू शकते. सातत्याने उशिरा जेवल्यामुळे हृदयरोग आणि मधुमेहासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे पचन सुधारण्यासाठी, उत्तम झोपेसाठी आणि दीर्घकालीन आरोग्यासाठी रात्रीचे जेवण लवकरात लवकर उरकणे हाच सुदृढ जीवनशैलीचा मंत्र आहे.

# २५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत शेगाव येथे ‘राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा’

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९बुलढाणा-** केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या वतीने येत्या २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान शेगांव येथे राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा २०२६ आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या आरोग्य मेळाव्याचे उदघाटन होणार आहे .अशी माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेगाव येथे पत्रकार परिषदेत दिली.



मंत्री जाधव यांनी सांगितले की, या मेळाव्याच्या उदघाटन कार्यक्रमाला राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री मकरंद पाटील, सह पालकमंत्री संजय सावकारे, कामगारमंत्री आकाश फुंडकर, आ.डॉ.संजय कुटे,अ.भा. आयुर्वेद महासंमेलन ट्रस्टचे अध्यक्ष पद्मश्री, पद्मविभूषण वैद्य देवेंद्र त्रिगुणा तसेच आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष वैद्य प्रो. राकेश शर्मा यांना निमंत्रित करण्यात आले आहे. आयोजनाची जबाबदारी ही अखिल भारतीय आयुर्वेद महासंम्मेलनाला देण्यात आली आहे.त्र्यंबकेश्वर येथे १९०७ साली स्थापन झालेली आयुर्वेदाची सर्वात मोठी संघटना असून देशभर कार्यरत आहे.आयुर्वेद महासंमेलनाचे उपाध्यक्ष डॉ.आशुतोष गुप्ता आयोजन समितीचे अध्यक्ष आहेत. या राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याच्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये आयुष चिकित्सा पद्धतींचा म्हणजेच आयुर्वेद, युनानी, सिद्धा, सोवा-रिग्पा, होमिओपॅथी, निसर्गोपचार व योगाचा प्रचार प्रसार व्हावा या दृष्टीकोनातून आयोजन करण्यात आले आहे.

चारही दिवस नागरिकांची व रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन त्यांना औषधोपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर विविध तज्ञांच्या व्याख्यानातून आरोग्य विषयक मार्गदर्शन तसेच शेतक-यांना वनौषधी लागवडी बाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या आरोग्य मेळाव्यात देशभरातील अनेक आयुष औषध निर्माता कंपन्या सहभागी होणार असून त्यांच्या माध्यमातून ’गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिसेस’चा अवलंब ते कशा पद्धतीने करीत आहेत,सोबतच आयुर्वेदामध्ये चाललेले नव- नवीन संशोधन याबद्दलची माहिती दिली जाणार आहे. आयुष औषधी निर्माता वर्गासाठी विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या ठिकाणी वनऔषधी प्रदर्शनाच्या माध्यमातून सामान्य लोकांना आपल्या जवळपास सापडणाऱ्या वन औषधींच्या साहाय्याने सोपे आणि माफक दरात उपचार कशा पद्धतीने उपलब्ध होऊ शकतात हे सांगितले जाणार आहे. या पत्रकार परिषदेला कामगारमंत्री आकाश फुंडकर, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील,आयुर्वेद महासंमेलनाचे उपाध्यक्ष डॉ.आशुतोष गुप्ता, कार्यकारी अधिकारी अवधेश कुमार श्रीवास्तव उपस्थित होते.

# एसटी सेवेच्या नव्या बसचे नाव आता होणार ‘राजमाता जिजाऊ’

## मातृशक्तीच्या प्रेरणेचा सन्मानचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती –** राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बस दाखल होणार आहेत. महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत या बसला ‘राजमाता जिजाऊ’ असे नाव देण्यात आल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. एसटीने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नावांनी बसेसना यापूर्वी गौरवले आहे. आता त्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.




एसटीच्या राज्यभरातील गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ताफ्यात ३ बाय २ आसन रचनेच्या ५५ आसनी अत्याधुनिक बस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, भगव्या आणि पांढऱ्या शुभ्र रंगसंगतीत सजलेल्या असणार आहेत.

राजमाता जिजाऊ’ हे नाव केवळ नामकरण नाही, तर स्वराज्याच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीच्या बांधीलकीचे एक सन्मानचिन्ह आहे. – प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री

**जिजाऊ या प्रेरणाशक्ती आहेत**

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. स्वराज्य संकल्पनेमागे राजमाता जिजाऊ या प्रेरणाशक्ती आहेत. त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी आहेत. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ एसटीच्या नवीन बसेसचे ‘राजमाता जिजाऊ’ असे नामकरण करण्यात आले आहे.

# उद्धव ठाकरे पुन्हा परिषदेवर? मविआची कोंडी वाढली

## भाजपला ॲडव्हान्टेज, नवे चेहरे येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९मुंबई**

उद्धवसेनेचे पक्षप्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह विधान परिषदेच्या नऊ आमदारांचा कार्यकाळ लवकरच संपणार असून, ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर जातील का, याबाबत उत्सुकता असेल. विधान परिषदेच्या निवडणुकीत भाजप-महायुतीला बहुतांश जागा मिळतील असे चित्र आहे. महाविकास आघाडीला फटका बसेल.

विधानसभेच्या सदस्यांमधून हे नऊजण विधान परिषदेवर मे २०२० मध्ये बिनविरोध निवडून गेले होते. त्यावेळी महाविकास आघाडीला पाच, तर भाजपला चार जागा मिळाल्या होत्या. मात्र यावेळी महायुतीचे संख्याबळ तब्बल २३५ इतके आहे. मविआकडे माकप, शेकाप मिळून ४८ विधानसभा सदस्य आहेत. अन्य दोन पक्षांचे तीन आमदार आहेत. दोन जागा रिक्त आहेत. मेमधील विधान परिषद निवडणुकीपूर्वी विधानसभेच्या दोन जागांसाठी पोटनिवडणूक झाली तर विधानसभेचे सर्व २८८ आमदार विधान परिषदेसाठी मतदान करतील.

विधान परिषदेच्या आधी सात जागांसाठी राज्यसभा निवडणूक होणार आहे. त्यात मविआला एक जागा मिळेल, असे संख्याबळ सांगते. ती जागा मविआतील एका पक्षाला दिली गेली, तर दुसऱ्या पक्षाला विधान परिषदेची एक जागा दिली जाईल. भाजपाचे चारपैकी तीन जण गोपीचंद पडळकर, प्रवीण दटके, रमेश कराड हे विधानसभेवर निवडून गेलेले आहेत. त्यामुळे नवीन चेहरे पक्षाकडून दिले जातील. सोलापूरच्या राजकारणात गेल्या काळात झालेल्या घडामोडींनंतर दुरावलेले रणजितसिंह मोहिते पाटील यांच्याबाबत भाजपा काय निर्णय घेणार ते महत्त्वाचे असेल.

**तडजोड करावीच लागणार**

उद्धव ठाकरे यांनी विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देताना केली होती; पण नंतर त्यांनी राजीनामा दिला नाही. यावेळी ते स्वतः विधान परिषदेवर जाण्यासाठी इच्छुक असतील का आणि मविआ एकमताने त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करेल का, हे महत्त्वाचे असेल.



२० विधानसभा सदस्य असलेल्या उद्धवसेनेने राज्यसभेच्या एका जागेसाठी काँग्रेस वा शरद पवार गटाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला, तर ठाकरे विधान परिषदेवर जाणार असा त्याचा अर्थ असू शकेल. मविआतील पक्षांना राज्यसभा व विधान परिषदेसाठी तडजोड करावी लागणार आहे. त्याचवेळी इच्छुकांची गर्दी असल्याने कोणाला संधी द्यायची हे आव्हान भाजपसमोर असेल.

**हे नऊ आमदार जिंकले होते**

उद्धव ठाकरे (उद्धवसेना), डॉ. नीलम गोऱ्हे (तेव्हा उद्धवसेना आता शिंदेसेना), शशिकांत शिंदे (शरद पवार गट), अमोल मिटकरी (अजित पवार गट), राजेश राठोड (काँग्रेस), गोपीचंद पडळकर, प्रवीण दटके, रणजितसिंह मोहिते, आणि रमेश कराड (भाजप).

# लाडकी बहीण योजनेंतर्गत ई-केवायसीसाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती-** ’मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांनी ई-केवायसी करताना तांत्रिक किंवा नजरचुकीने माहिती भरताना चूक केली. अशा लाडक्या बहिणी आता ऑनलाइन ई-केवायसी करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत सुधारणा करण्यासाठी शेवटची संधी उपलब्ध करून दिलेली आहे. यामुळे लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला आहे.’मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मुदत दिली होती. परंतु सदर प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थी महिलांकडून लाभार्थ्याच्या कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकार स्थानिक संस्थेमध्ये



कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तिवेतन घेत आहे किंवा कसे याबाबतपर्याय निवडताना हजारो महिलांना चुकीचा पर्याय निवडला गेल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे योजनेतील निकषाच्या अनुषंगाने सदर लाभार्थी महिलांची सखोल तपासणी करून लाभार्थ्यांच्या पात्रता-अपात्रतेची प्रत्यक्ष पडताळणी करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना शासनाने २० जानेवारी २०२६ रोजी एका आदेशान्वये निर्देश दिले होते. तथापि सदर लाभार्थीची जलद गतीने पडताळणी करण्यासाठी ऑनलाईन -केवायसीमध्ये पुन्हा सुधारणा करण्याची संधी देण्यात यावी, अशी मागणी योजनेच्या लाभार्थ्यांकडून व क्षेत्रीय कार्यालयाकडून होत आहे. त्याअनुषंगाने ऑनलाइन ई-केवायसीमध्ये एकदा सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने आता ’मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेंतर्गत ३१ डिसेंबरपर्यंत ज्या लाभार्थी महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे, परंतु सदर प्रक्रिया पूर्ण करताना पर्याय निवडताना नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडलेल्या लाभार्थी महिलांसाठीच ऑनलाइन ई-केवायसीमध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी ३१ मार्चपर्यंत उपलब्ध करून दिलेली आहे.

लाडकी बहीण योजनेत ई-केवायसी योजनेतील चुकांची दुरुस्ती करण्यासाठी ६ फेब्रुवारी रोजी शासनाने ३१ मार्चपर्यंत मुदत दिली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ९ फेब्रुवारी २०२६ शहर/ग्रामिण

# धारणीतील महाविधी शिबिरात शेवटचा घटक आश्वस्त

## विधी सेवा प्राधिकरणाचा उपक्रम, ३६ स्टॉलवर शासकीय विभागांची माहिती





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती-** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणातर्फे धारणी येथे आज महाविधी शिबिर घेण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित न्यायमूर्ती आणि अधिकाऱ्यांनी संविधानाला अभिप्रेत असलेला शेवटच्या घटकाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. धारणीतील महाशिबिरही न्यायप्रक्रियेबाबत जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी घेण्यात आला आहे, असे मत व्यक्त केले. यासोबतच ३६ स्टॉलवर शासकीय विभागांनी माहिती दिली.कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून न्यायमूर्ती अनिल किलोर, तर मार्गदर्शक म्हणून न्यायमूर्ती प्रविण पाटील उपस्थित होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब रायबोले, नगराध्यक्ष सुनील चौथमल, धारणी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. प्रेमलाल कोगेकर, दत्तात्रय वमणे उपस्थित होते.न्यायमूर्ती श्री. किलोर यांनी शिबिराच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचलो आहेत. शिबिराचे हे ध्येय असून न्याय लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या माध्यमातून मदत होणार आहे. संबंधिताला अधिकार आहेत, याची जाणीव करून देणे आणि त्याला माहिती देणे यासाठी शिबिर महत्वाचे ठरणार आहे. या परिसरात असलेल्या जमिनीचा प्रश्न, उच्च शिक्षणाची सोय, यासोबतच न्यायालयांसाठी जागा आदींबाबत सकारात्मक पावले उचलण्यात येतील. या भागात पॉस्कोच्या तक्रारी जादा असल्याने याबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे. त्यामुळे खटल्यांची संख्या कमी होऊन अन्याय दूर होण्यास मदत होईल, असे सांगितलेन्यायमूर्ती प्रवीण पाटील यांनी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत न्यायाचा संदेश पोहोचविण्यासाठी हा प्रयत्न करण्यात आलेला आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याचे न्याय अधिकाराबाबत जनजागृती करणे हाच या शिबिरामागील उद्देश आहे. समाजामध्ये शोषणाविरुद्ध मौन बाळगल्यास असे करणाऱ्या व्यक्तीला बळ मिळत असल्याने या शिबिराच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. त्यासोबतच नागरिकांना आवश्यक असणाऱ्या योजनांची माहितीही देण्यात येत आहे. त्यामुळे नागरिक आणि न्यायव्यवस्था यांच्या सहकार्यातून मजबूत लोकतंत्र तयार होणार आहे. नागरिकांनी कोणताही संकोच न बाळगता न्याय मागण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांनी या शिबिरामुळे न्यायाची संकल्पना दुर्गम भागात पोहोचवली जाणार आहे. विधी सेवा हा सेतू म्हणून कार्य करीत असल्याने नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही. या माध्यमातून मदतीचे कर्तव्य बजाविल्या जाणार असल्याचे सांगितले.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी धारणीमध्ये दुसऱ्यांदा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याठिकाणी अकराशे नागरिकांना वनपट्टे वाटप करण्यात आले आहे. वर्ग एक जमीन करण्याबाबत काही अडचणी येत असल्यास विशेष शिबिर घेऊन प्रश्न मार्गी काढण्यात येतील. न्यायालयासाठी धारणी उपविभागीय कार्यालयातील जागा देण्यात येणार आहे. त्यामुळे न्यायालयाचे कामकाज तातडीने सुरू होईल, असे सांगितले.कार्यक्रमात तालुका कृषी अधिकारी, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया, पंचायत समिती, तहसील कार्यालय, वनविभाग, पोलीस स्टेशन, मोटार अपघात प्राधिकरण, महिला व बाल विकास आणि भूमि अभिलेख कार्यालयाच्या वतीने विविध लाभाचे वाटप करण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवरांची समायोजित भाषणे झाली.

धारणी तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. प्रेमलाल कोगेकर यांनी प्रास्ताविक केले. ड. धर्मेंद्र पंडित यांनी आभार मानले.साद्राबाडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील फ्रंट वर्कर्स यांनी बालविवाह, अंधश्रद्धा निर्मूलन याविषयावर पथनाट्य सादर केले. चिखलदरा अंध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाची सुरुवात विधी सेवा प्राधिकरणाच्या नालसा आणि मालसा गीताने करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी रोपट्यांना पाणी देऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विधी सेवा प्राधिकरणाच्या उद्दिष्टांचा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचविण्यात आला.

# स्थायी समिती व स्वीकृत सदस्यांसाठी राजकीय हालचालींना वेग

## अमरावती महापालिकेत 'पदासाठी' नेत्यांची मनधरणी सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती-** अमरावती महापालिकेत महापौर व उपमहापौरांची निवडणूक शुक्रवार, दि. ६ रोजी पार पडली असून, त्यानंतर आता स्वीकृत नगरसेवक व स्थायी समिती सदस्यांच्या नियुक्तीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महापालिकेतील सत्तासमीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या प्रक्रियेमुळे राजकीय नेत्यांची धावपळ पुन्हा एकदा वाढली आहे. पराभूत उमेदवारांसह इच्छुक नगरसेवकांनी नेत्यांकडे लॉबिंग सुरू केल्याने राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे.महापालिकेत एकूण ८७ निवडून आलेले नगरसेवक आहेत. नगरविकास विभागाने २०२३ मध्ये केलेल्या नियमबदलानुसार आता एकूण सदस्यसंख्येच्या १० टक्क्यांनुसार स्वीकृत नगरसेवक नामनिर्देशित करता येणार आहेत. त्यानुसार अमरावती महापालिकेत ८ स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती होण्याची दाट शक्यता आहे. भाजपकडून स्वीकृत सदस्यपदा साठी सर्वाधिक इच्छुक असल्याची माहिती असून, या पदासाठी मोठी गर्दी झाल्याचे चित्र आहे.येत्या आठवड्यात स्वीकृत नगरसेवक तसेच स्थायी समिती सदस्यांच्या निवडीसाठी विशेष सभा आयोजित केली जाण्याचे संकेत मिळत आहेत. स्थायी समिती ही महापालिकेतील आर्थिक व प्रशासकीय निर्णय घेणारी सर्वात महत्त्वाची समिती मानली जाते. त्यामुळे या समितीत स्थान मिळवण्यासाठी नगरसेवकांमध्ये तीव्र स्पर्धा पाहायला मिळत आहे.महापालिकेच्या स्थायी समितीत एकूण १६ सदस्यांची नियुक्ती होणार आहे. गट नोंदणीनुसार पाच नगरसेवकांमागे एका स्थायी समिती सदस्याची नियुक्ती केली जाणार आहे. विद्यमान पक्षीय बलानुसार भाजपचे ५, युवा स्वाभिमानचे ३, काँग्रेसचे ३, एमआयएमचे २, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे २ सदस्य स्थायी समितीत जाण्याची शक्यता आहे. १६ व्या सदस्या साठी बसप व शिंदेसेना यांच्यात ईश्वरचिठ्ठीद्वारे निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उद्धवसेना (२) आणि वंचित बहुजन आघाडी (१) यांची स्वतंत्र गट नोंदणी झालेली आहे.महापौर श्रीचंद तेजवानी हे स्थायी समिती सदस्यांची नावे अधिकृतरीत्या घोषित करणार आहेत. विशेष म्हणजे, महापौर व उपमहापौर निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाने भाजप व युवा स्वाभिमानच्या उमेदवारांना पाठिंबा दिला होता. या पार्श्वभूमीवर स्थायी समितीच्या निवडीतही राजकीय समीकरणे महत्त्वाची ठरणार असून, आगामी काही दिवस महापालिकेच्या राजकारणासाठी निर्णायक ठरण्याची चिन्हे आहेत.

# आदिवासींच्या हाताला 'कॉफी'चे बळ

## कॉफीच्या मूल्यवर्धित प्रॉडक्टसला मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती-** मेळघाटच्या चिखलदरा येथे होत असलेल्या कॉफीच्या उत्पादनामुळे मेळघाटातील आदिवासी महिलांना बऱ्यापैकी रोजगार प्राप्त झाला आहे. वर्धा येथील महात्मा गांधी ग्रामीण औद्योगीकरण संस्थानचे (एमगिरी) संचालक डॉ. आशुतोष मुरकुटे व शहापूर चिखलदरा येथील शिवस्फुर्ती प्रोसेसिंग क्लस्टरचे सुनील भालेराव यांच्या पुढाकारामुळे आदिवासी महिलांचे अनेक बचत गट या रोजगारात गुंतले आहेत. दरम्यान आदिवासी उत्पादित कॉफी मूल्यवर्धित प्रॉडक्टसलाही मोठ्या प्रमाणात मागणी आली असून, एमगिरी संस्थानचा जैव प्रसंस्करण विभाग आणि खादी स्फुर्ती क्लस्टरद्वारे मेळघाटातील आदिवासी मूळनिवासी बचतगटाच्या महिलांना या प्रॉडक्टसचे विनामूल्य वितरण करण्यात येत आहे. यापूर्वी आदिवासींचे दैवत बिरसा मुंडा यांच्या जयंतीदिनीदेखील अशीच कृती करण्यात आली होती. शिवस्फुर्ती प्रोसेसिंग क्लस्टरद्वारा चिखलदरा, मरियमपूर, शहापुर, खटकाली, आमझरी या गाविलगड बफर वनक्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या कॉफीच्या उत्पादनातून सुमारे दोन वर्षापासून स्थानिक आदिवासींना रोजगार पुरवला जात आहे.

# हॉटेल ३६५ येथील हुक्का पार्लरवर पोलिसांची धाड

## मालक छाबडाविरुध्द गुन्हा दाखल





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती-** जुना बायपासवरील हॉटेल ३६५ मध्ये - सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर राजापेठ न पोलिसांनी धाड घालून हुक्का पिण्याचे साहित्य जप्त केले तसेच हॉटेल मालकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. महेश मोहनलाल छबडा (वय - ४६, रा. बाबा हरदासराम सोसायटी, कंवरनगर) असे गुन्हा दाखल झालेल्या - हॉटेल मालकाचे नाव आहे.

हॉटेल ३६५ नेहमीच कुठल्या ना कुठल्या कारणाने चर्चेत राहते. यापूर्वीसुध्दा या हॉटेलात पोलिसांनी धाड घातली होती तर काही युवकांनी हॉटेलला आग लावली होती. तसेच काही सामाजिक कार्यकर्त्यांना हॉटेलमध्ये पब सुरू असून अल्पवयीन मुलींना निःशुल्क प्रवेश दिला जातो आणि युवकांकडून पबमध्ये जाण्याची प्रवेश फी २५० ते ३००, रुपये घेतली जाते, असा आरोप घेत पब बंद केला होता. तेव्हापासून पोलिसांचे हॉटेल ३६५ वर विशेष लक्ष आहे. परंतु मागील एक वर्षापासून पोलिसांचे संबंधित हॉटेलवर दुर्लक्ष होते. त्यामुळेपुन्हा या हॉटेलमध्ये चोरून लपून पब व हुक्का पार्लर सुरु असल्याची गुप्त माहिती पोलिसांना होती. त्यामुळे शनिवारी रात्री पोलिसांनी हॉटेल ३६५ येथे धाड टाकली असता एका रुममध्ये चार युवक हुक्का पितांना दिसताच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी सांगितले की हॉटेल मालक महेश छाबडा व मॅनेजर आकाश मुरलीधर ठाकरे यांनी हुक्का, प्रतिबंधित तंबाखु आणि हुक्क्याचे वेगवेगळे फ्लेवर दिले. तेव्हा पोलिसांनी हुक्का व हुक्का पिण्याचे साहित्य असा एकूण १ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून हॉटेलमालकविरोधात गुन्हा दाखल केला आहे.-

# कत्तलीकरिता बांधलेल्या दहा जनावरांची सुटका

## ॲकेडमी शाळेच्या आवारात बांधली होती जनावरे



**विदर्भ प्रजासत्ताकदि.९अमरावती**

कत्तलीकरिता घेऊन जाणाऱ्या १० जनावरांची गुन्हे शाखेच्या पथकाने सुटका करून गौरक्षणमध्ये पाठवले. परंतु जनावरे बांधून ठेवणारा युवक पसार झाल्यामुळे पोलीस त्याच्या शोधात आहेत. या प्रकरणात नागपुरी गेट पोलिसांनी गुन्हा दाखल करून युवकाच्या शोधात आहेत. वाजीद उर्फ वज्जू कुरेशी (रा. गवळीपुरा) असे गुन्हा दाखल झालेल्या युवकाचे नाव आहे.नागपुरी गेट येथील ॲकेडमी शाळेच्या आवारात झाडाझुडपात काही जनावरे कत्तलीकरीता बांधून ठेवले आहे अशी माहिती गुन्हेशाखेच्या पथकाला मिळताच शनिवारी रात्री गुन्हेशाखेचे पथक शाळेत पोहचले तेव्हा एक युवक एका जनावराला कत्तलीकरिता घेऊन जातांना दिसताच, पोलिसांनी त्याला पकडण्याचा प्रत्यन केला असता तो अंधारात गल्लीतून पळून गेला. त्यामुळे पोलिसांनी बांधलेली १० जनावरे एकूण किमंत २ लाख ५५ हजार रुपये ताब्यात घेऊन गौरक्षणमध्ये पाठवीले. तसेच या प्रकरणात नागपुरीगेट पोलिसांनी गुन्हादाखल करून युवकाचा शोध सुरू केला

# कमरेला पिस्तूल लावून फिरत होते 'विधिसंघर्षित बालक'

## गुन्हे शाखेने बडनेऱ्यात पकडली जीवघेणी शस्त्रे, काडतुसेही जप्त




**विदर्भ प्रजासत्ताकदि.९ अमरावती**

शहरात अवैध शस्त्रांची तस्करी आणि वापर करणा-यांविरोधात शहर पोलिसांनी कंबर कसली असून, गुन्हे शाखेने शनिवारी एक मोठी कारवाई केली आहे. बडनेरा परिसरात दोन विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यातआले असून, त्यांच्याकडून दोन देशी बनावटीचे कट्टे 'पिस्तूल' आणि दोन जिवंत काडतूस जप्त करण्यात आली. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शहरातील अवैध शस्त्रधारकांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशावरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली एक पथक गस्त घालत होते. यादरम्यान गुप्त बातमीदाराकडून बडनेरा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शिवाजी नगर परिसरातील रेल्वे लाईनकडे जाणाऱ्या कच्च्या रोडवर दोन तरुण कमरेला शस्त्र लावून संशयास्पद रित्या फिरत असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्याआधारे ट्रॅप रचण्यात आला.याप्रकरणी संबंधित दोन्ही विधीसंघर्ष बालकांविरुद्ध बडनेरा पोलीस स्टेशन येथे आर्म ॲक्टअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त (गुन्हे) गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, रमेश धुमाळ, आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले व गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी केली.

# जिल्ह्यात ५६ प्रकल्पांत ७१ टक्के साठा; यंदा १३ टक्क्यांनी कमी

## गत वर्षी याच कालावधीत होता ८४ टक्के पाणी साठा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती**

जिल्ह्यात १ मोठ्या, ७ मध्यम सह ४८ लघु प्रकल्प असून, सद्यः स्थितीत सर्व प्रकल्पांमध्ये ७९.६६ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.आगामी काळात पाण्याची तीव्र पाणी टंचाई जाणवण्याची शक्यता नाकारता येत नाही. मागील वर्षी याच कालावधीमध्ये ८४ टक्के पाणीसाठा होता. तो यंदा १३ टक्क्यांनी कमी झाला आहे.गत वर्षी जिल्ह्यातील समाधानकारक पाऊस झाला तर काही ठिकाणी पावसाने दांडी मारल्याने अनेक धरणातील पाण्याची पातळी कमी होती. अमरावती जिल्ह्यातगेल्या वर्षाच्या तुलनेने यंदा धरणात १३ टक्के पाणीसाठा कमी असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात लहान, मोठे, मध्यम असे एकूण ५६ मध्यम प्रकल्प आहे.यामध्ये गेल्यावर्षी फेब्रुवारीपर्यंत ८४ टक्के पाणीसाठा होता. तर सद्यःस्थितीला याच प्रकल्पांमध्ये ७९.६६टक्के उपयुक्तसाठा आहे. जर धरण पाणलोट क्षेत्रात पाऊस न झाल्यास जिल्ह्यावर पाणी टंचाईचे संकट येऊ शकते. जिल्ह्यातील ऊर्ध्व वर्धा प्रकल्पात आजपर्यंत १९८.३० दलघमी पाणीसाठा असून, याची ७०.६१ इतकी टक्केवारी आहे.तसेच शहानूर, चंद्रभागा, पूर्णा, सपन, पंढरी, आणि गंगा या सहा मध्यम प्रकल्पात ८८.४६ दलघमी असून, याची ५६.२४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहेत. तर एकूण ४२ लघु प्रकल्पात ५०.५७ दलघमी असून ४८. ९९ टक्के इतका पाणीसाठा आहे. १ मोठा ६ मध्यम तर ४२ लघु प्रकल्पात १६२.६७. २४ दलघमी पाणीसाठा असून ७९.६६ इतके टक्के पाणी आहेत.

# १६ वर्षांनंतर जनगणना-२०२७ला गती

## १ एप्रिलपासून अमरावती जिल्ह्यात घराघरांत माहिती संकलन

### चार हजारांवर प्रगणक, १ एप्रिलपासून घेणार मोबाइल ॲपद्वारे ऑनलाइन नोंद



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती**

सन २०११ नंतर तब्बल १६ वर्षांनी भारताची जनगणना-२०२७ पुन्हा एकदा मार्गी लागली असून, कोरोना काळामुळे रखडलेली ही महत्त्वाची प्रक्रिया आता वेग घेत आहे. अमरावती जिल्ह्यात १ एप्रिलपासून जनगणनेला सुरुवात होणार असून, चार हजारांहून अधिक प्रगणक घराघरांत जाऊन नागरिकांकडून माहिती संकलित करणार आहेत. यावेळी जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने राबविली जाणार असून, सर्व माहिती मोबाइल ॲपद्वारे ऑनलाइन नोंदवली जाणार आहे.जिल्ह्यात सध्या हाऊस लिस्टींग ब्लॉक (एचएलबी) अंतर्गत प्राथमिक कामे सुरू आहेत. साधारणपणे ७०० ते ८०० लोकसंख्या असलेला एक एचएलबी निश्चित करण्यात आला आहे. या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, प्रत्यक्ष जनगणनेसाठी प्रशासन सज्ज झाले आहे.या जनगणनेत नागरिकांना एकूण ३३ महत्त्वाचे प्रश्न विचारले जाणार आहेत. यामध्ये घराची रचना, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छता, वीज, कुटुंबातील सदस्यांची संख्या, शिक्षणाची पातळी, रोजगार, संपर्क व दळणवळणाच्या सुविधा यासह विविध सामाजिक-आर्थिक बाबींचा समावेश असणार आहे. धरसूची व गृहगणना अनुसूचीद्वारे ही माहिती गोळा केली जाणार आहे.जनगणनेदरम्यान संकलित होणारी सर्व माहिती गोपनीय ठेवली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी निर्भयपणे आणि अचूक माहिती द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. सर्व माहिती थेट प्रगणकाच्या मोबाइलमधील अधिकृत ॲपमध्ये नोंदवली जाणार असल्याने चुका टाळण्यास मदत होणार आहे.या संपूर्ण प्रक्रियेवर प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी आणि जिल्हा जनगणना अधिकारी तथा आरडीसी यांचे नियंत्रण राहणार आहे. भारताचे रजिस्ट्रार जनरल यांच्या निर्देशानुसार जनगणना अधिनियम १९४८ अंतर्गत २२ जानेवारी रोजी अधिसूचना जारी करण्यात आली असून, नियुक्त प्रगणक नागरिकांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलित करणार आहेत. जनगणना-२०२७मुळे जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक नियोजनाला दिशा मिळणार असल्याचे प्रशाशकीय अधिकारी यांनी दैनिक विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना सांगितले .

### आधुनिक सुविधांचीही घेणार माहिती

जनगणनेत रेडिओ,केबल टीव्ही, इंटरनेट, लॅपटॉप किंवा संगणक, दूरध्वनी, मोबाइल व स्मार्टफोनची उपलब्धता, तसेच सायकल, दुचाकी, चारचाकी वाहन माहिती नोंदवली जाणार आहे. कुटुंबात वापरले जाणारे मुख्य धान्य आणि जनगणनेशी संबंधित संवादासाठी मोबाइल क्रमांकही विचारला जाणार आहे.

### जनगणनेत पहिल्यांदा जातनिहाय नोंद

या जनगणनेतील सर्वात महत्त्वाचा व चर्चेचा मुद्दा म्हणजे पहिल्यांदाच जातनिहाय नोंदीचा आहे. कुटुंबप्रमुख अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर प्रवर्गातील आहे का, याची अधिकृत नोंद केली जाणार आहे. यामुळे भविष्यातील धोरणे, विकास आराखडे आणि शासकीय योजनांचे नियोजन अधिक अचूक होण्यास मदत होणार आहे.

### विवाहित जोडप्यांची संख्या किती?

प्रगणकांद्वारे घरातील खोल्यांची संख्या, विवाहित जोडप्यांची संख्या, पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत व उपलब्धता, प्रकाशाचा स्रोत, शौचालय व स्नानगृहाची उपलब्धता, सांडपाणी निचरा व्यवस्था, स्वयंपाकघर व एलपीजी/पीएनजी कनेक्शन, तसेच स्वयंपाकासाठी वापरले जाणारे मुख्य इंधन याचीदेखील माहिती घेतली जाणार आहे.

# प्रगट दिनी लाखावर भाविकांनी फुलली शेगाव नगरी! राज्यातून शेकडो भजनी दिंड्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९शेगाव–** धन्य आज दिन संत दर्शनाचा, अनंत जन्मीचा क्षीण गेला, मज वाटे त्यासी अलिंगन द्यावे,सदा न सोडावे चरण तयाचे या अमृतवाणी प्रमाणे संत गजानन महाराजांचा १४८ वा प्रगट दिन उत्सव सोहळा आज (८ फेब्रुवारी) भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

या सोहळ्यानिमित्त संतनगरी लाखावार भाविकांनी फुलल्याचे दिसून आले. राज्यभरातून आलेल्या कामी अधिक हजार दिंड्या व वारकऱ्यांच्या जय घोषानी शेगाव नगरीतील वातावरण आणखीनच मंगलमय झाल्याचे दिसून आले.

श्रींच्या प्रगट दिनानिमित्त ७ फेब्रुवारी च्या संध्याकाळ पर्यंत राज्याच्या कानाकोपऱ्यातून साडेसातशे च्या वर भजनी दिंड्या संतनगरीत दाखल झाल्या होत्या भजनी दिंड्या येण्याचा ओघ रात्री उशिरापर्यंत सुरु होता.

प्रगट दिन उत्सव सोहळ्यास २ फेब्रुवारीपासून प्रारंभ झाला. फेब्रुवारी श्रींच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये दररोज मंदिरामध्ये सकाळी ६ ते ६.४५ काकडा, सकाळी ७.१५ ते ९.१५ भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.३० ते ६ हरिपाठ व रात्री ८ ते १० पर्यंत श्रीहरी कीर्तन पार पडले.

महाराष्ट्रातील नामवंत महाराजांचे कीर्तन पार पडले. महारुद्र स्वाहाकार यज्ञाला २ फेब्रुवारीला आरंभ होऊन आज ८



फेब्रुवारी श्रींच्या प्रगटदिनी सकाळी १० वाजता यागाची पूर्णाहुती व अवभृतस्नान झाले. त्यानंतर आज रविवारी सकाळी भरत बुवा पाटील, म्हैसवाडी यांचे सकाळी १० ते १२ शेगांवी श्रींच्या प्रागट्या निमित्य कीर्तन पार पडले.

आकर्षक सजावट

श्रींच्या प्रगट दिन उत्सव निमित्त मंदिरात व मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. श्रींच्या समाधी मंदिरावर, परिसरात पिवळा रंगाची विधुत रोषणाई व तर प्रवेशद्वार यावर रंगीबेरंगी आकर्षक अशी विधुत रोषणाई करण्यात आली . मंदिर परिसर संपूर्ण केळीचे खांब लावून सजवण्यात आला होता.श्रींच्या मंदिर परिसरात गर्दी होईल हे लक्षात घेऊन एकेरी मार्ग करण्यात आला आहे. त्यामध्ये श्रींची समाधी दर्शन व्यवस्था, श्रीमुख दर्शन व्यवस्था, महाप्रसाद, पारायण कक्ष मंडप आदि व्यवस्था करण्यात आली आहे.

पालखीची नगर परिक्रमा


दुपारी ४ वाजताचे आसपास श्रींच्या पालखीचे नगरपरिमेला सुरुवात झाली. गजानन महाराज मंदीर उत्तर द्वार (जनरेटर रुम जवळील) मधुन बाहेर, महात्मा फुले बँकेसमोरुन, क्रांतीसुर्य ज्योतीराव फुले चौक, संत सावता महाराज चौक, श्री हरिहर मंदीर, भीम नगर, तिन पुतळा परिसर, न प शाळा क्र. २, फुले नगर, श्री प्रगटस्थळ, सितामाता मंदीर, श्री लायब्ररी पुलावरुन श्रीं मदीराचे पश्चिम द्वार मधुन श्रींचे मंदीर परिसरामध्ये पालखी परतली.

# तेलंगणात भाजपाच्या प्रचाराला जोरदार सुरुवात

## नवनीत रवि राणा यांच्या रोड शोला उस्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ नारायण पेठ तेलंगणा**
तेलंगणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या नेत्या व 'हिंदू शेरणी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजी खासदार नवनीत रवि राणा यांनी भैंसा (ता. भैंसा, जि. निर्मल), खानापूर, नारायणपेठ व मक्तल





(जि. नारायणपेठ) येथे भव्य रोड शो व जाहीर सभांच्या माध्यमातून भाजपाच्या प्रचाराला जोरदार सुरुवात केली. या दौऱ्यात महिला, युवती व युवकांचा प्रचंड सहभाग पाहायला मिळाला असून संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.प्रचाराच्या प्रारंभी नवनीत राणा यांनी भारतातील एकमेव अर्धपीठ असलेल्या तेलंगणा राज्यातील बासर येथील पवित्र श्री ज्ञान सरस्वती मंदिरात जाऊन आई सरस्वतीच्या चरणी नतमस्तक होत आरती व दर्शन घेतले. आई सरस्वतीच्या आशीर्वादाने प्रचाराची सुरुवात केल्याने कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह दिसून आला.जाहीर सभेच्या मंचावर नवनीत राणा येताच उपस्थित नागरिकांनी जय श्रीराम व जय हनुमान च्या गगनभेदी घोषणांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. भगवे झेंडे, घोषणाबाजी आणि मोठ्या जनसमुदायामुळे सभास्थळ भारावून गेले होते.यावेळी बोलताना नवनीत रवि राणा यांनी विरोधकांवर कडाडून टीका केली. भारत देशात फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निळाच चालणार आहे. कॉंग्रेस म्हणजे ओवेसी आणि ओवेसी म्हणजे कॉंग्रेस. एम.आय.एम. पक्षाचे ओवेसी बंधू देशाच्या भविष्यासंदर्भात जी स्वप्ने पाहत आहेत, ती कधीही पूर्ण होऊ देणार नाही, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले.पुढे त्या म्हणाल्या, तेलंगणाचा मुख्यमंत्री हटवा, भाजपाचा मुख्यमंत्री बनवा आणि राज्याचा सर्वांगीण विकास साधा. कॉंग्रेस हटाव, तेलंगणा बचाव. ओवेसी हटाव, तेलंगणा बचाव, असे आवाहन त्यांनी जनतेला केले.देशाचे यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी मांडलेला विकासाचा संकल्प हा केवळ शब्दांचा नसून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा ठाम निर्धार आहे. त्या विकास संकल्पाला साथ देत तेलंगणाचा सर्वांगीण विकास साधणे हेच भाजपाचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाचाच झेंडा फडकवावा आणि सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहनही त्यांनी केले.या सभेला तेलंगणा भाजपा प्रदेश अध्यक्ष एन. रामाचंद्र राव, प्रदेश उपाध्यक्षा श्रीमती कोळी माधवी, तेलंगणा प्रभारी आमदार आशिष शेलार, प्रदेश सचिव डॉ. एन. गौतम राव, जिल्हाध्यक्ष रितेश राठोड, स्थानिक आमदार पवार रामाराव पाटील तसेच माजी आमदार श्रीमती सुमनबाई राठोड यांची विशेष उपस्थिती होती. सर्व नेत्यांनी भाजपाच्या विकासात्मक धोरणांवर विश्वास व्यक्त केला.या रोड शो व जाहीर सभेमुळे तेलंगणातील राजकीय वातावरण तापले असून भाजपाच्या प्रचाराला नवे बळ मिळाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# गडचिरोलीत नक्षलवादाचे कंबरडे मोडले, आता उरले फक्त सात!

## येत्या ३१ मार्चपूर्वीच नक्षलवाद मुक्तीचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला दृढ विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९गडचिरोली–**
गडचिरोलीत १९८० च्या सुमारास नक्षली प्रथम आले. सुरुवातीला नक्षल्यांचीच दहशत होती. परंतु आता केंद्र आणि राज्य सरकारांच्या कठोर भूमिकेमुळे देशातून तसेच महाराष्ट्रासह नक्षल प्रभावित राज्यातून नक्षलवादाचे कंबरडे मोडले आहे. गडचिरोली जिल्ह्यात ३१ मार्च या डेडलाईन पूर्वीच नक्षलवाद संपुष्टात येण्याची चिन्हे आहे. कारण आता फक्त ७ नक्षली उरले आहेत. सी–६०, सीआरपीएफ सह सुरक्ष दलाच्या झीरो टॉलरन्समुळे नक्षल चळवळ जवळपास मोडीत निघाली आहे.

**डेडलाइनपूर्वीच नक्षलमुक्त–** गडचिरोली जिल्हा नक्षलवादाचे प्रमुख केंद्र राहिले. नक्षलग्रस्त जिल्हा अशी गडचिरोलीची ओळख बदलण्या चा निश्चय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केला आहे. त्यासाठी गडचिरोलीचे पालक मंत्रिपदही स्वत:कडे ठेवले आहे. राज्य सरकारचे झीरो टॉलरन्स धोरण आणि गडचिरोली पोलिसांच्या कारवाईमुळे नक्षली संपत चालले आहे.

महायुती सरकारने झीरो टॉलरन्सचे धोरण स्वीकारले. विशेषतः २०१४ ते २०२५ या कालावधीत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नक्षलवादाच्या विरोधात कठोर धोरण स्वीकारून महाराष्ट्र नक्षलमुक्त मोहिमेचे नेतृत्व केले. त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यात नक्षलवाद्यांसाठी आत्मसमर्पण आणि पुनर्वसन योजना, सुरक्षा यंत्रणांचे आधुनिकीकरण आणि




गडचिरोलीसह नक्षलप्रभावित भागांत पायाभूत विकास, शिक्षण, रोजगार आणि आरोग्याच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. स्थानिकांना विकासाचा लाभ थेट पोहोचवून नक्षलवादाच्या मुळावर प्रहार करण्यात आला.

# १२ फेब्रुवारीला देशव्यापी संप

## कामगार संघटनांकडून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाची हाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती–** केंद्र सरकारच्या कामगारविरोधी आणि कॉर्पोरेटधार्जिण्या धोरणांविरोधात देशातील केंद्रीय कामगार संघटना व फेडरेशनने १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी संपाची हाक दिली आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. संयुक्त कामगार कर्मचारी संघटना कृती समितीने या संपात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

अनेक वर्षांच्या संघर्षानंतर मिळालेले कामगार हिताचे ४१ कायदे केंद्र सरकारने रद्द केले आहेत. त्याऐवजी कामगारविरोधी आणि भांडवलदारांच्या हिताच्या ४ नवीन श्रम संहिता आणल्या आहेत. या श्रम संहितांच्या अंमलबजावणीची अधिसूचना २१ नोव्हेंबर रोजी काढण्यात आली



आहे.

या नवीन श्रम संहितांमुळे कामगारांचा युनियन स्थापन करण्याचा, किमान वेतन मागण्याचा किंवा पेन्शनसारखी सामाजिक सुरक्षा मागण्याचा अधिकार संपुष्टात आला आहे. याशिवाय, ग्रॅच्युइटी, भविष्य निर्वाह निधी आणि बोनस यांसारख्या हक्कांवरही गदा आली आहे. स्थायी कामगारांऐवजी 'फिक्स टर्म एम्प्लॉयमेंट'द्वारे केवळ ४ ते ५ वर्षांसाठी कामगारांना कामावर ठेवले जाईल आणि त्यानंतर त्यांना कधीही कमी केले जाऊ शकते.

या कामगारविरोधी ४ श्रम संहितांविरोधात १० केंद्रीय कामगार संघटना आणि ११ फेडरेशनने हा देशव्यापी संप घोषित केला आहे. हा संप कामगार, शेतकरी आणि शेतमजुरांचा आहे.

अमरावतीमध्ये, मोर्चाचा शुभारंभ इर्विन चौकातून दुपारी १.३० वाजता होईल. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचल्यानंतर तेथे दोन तास धरणे सत्याग्रह करण्यात येणार आहे.

या देशव्यापी संपात आयटक, सीटू आणि इतर संघटना सहभागी होत आहेत. यात केंद्रीय कर्मचारी, बँका आणि एलआयसीचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स, शालेय पोषण आहार कामगार, बांधकाम कामगार तसेच किसान सभा आणि शेतमजूर संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

# अकोला बार असोसिएशनच्या निवडणुकीची रणधुमाळी

## चार जागांसाठी १४ उमेदवार रिंगणात, १३ ला मतदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अकोला–** अकोला : अकोला बार असोसिएशनच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. चार जागांसाठी एकूण १४ उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी १३ ला मतदार होणार असून वकिलांमध्ये प्रचार केला जात आहे. निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे आहेत.

अकोला बार असोसिएशनचा वार्षिक निवडणूक कार्यक्रम ३१ जानेवारी रोजी जाहीर केला. २ ते ५ फेब्रुवारीपर्यंत अध्यक्ष, उपाध्यक्ष, महिला उपाध्यक्ष व सहसचिव पदासाठी उमेदवारी अर्ज मागविण्यात आले. ५ फेब्रुवारीपर्यंत अध्यक्षपदासाठी एकूण तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले.

ॲड. संजय देशमु... विद्यमान अध्यक्ष ड. हेमसिं... मोहता, ड. अजय वाघमारे यांचा समावेश आहे. उपाध्यक्ष पदासाठी तीन अर्ज दाखल झाले. ड. विजय भांबेरे, ड. सुमेध डोंगरदिवे, राहुल वानखडे यांचा समावेश आहे. महिला उपाध्यक्ष पदासाठी ड. शितल गवई, ड. संगिता गावंडे, ड. शारदा मल्होत्रा, ड. निर्मला नागदेवे, ड. मंजू सावरकर यांनी, तर सहसचिव पदासाठी ड. पवनेश अग्रवाल, ड. आकाश भगत, ड. प्रमोद कोरडे यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. ७ फेब्रुवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत होती. ...कोणत्याही उमेदवारांनी अर्ज ...गे न घेतल्याने सर्व पदांसाठी ... अंतिम उमेदवारांची यादी ... अकोला बार असोसिएशनच्या मुख्य ...सुचना फलकावर प्रसिद्ध ...ती आहे. अकोला बार असोसिएशनची वार्षिक निवडणुकीमध्ये १३ फेब्रुवारी रोजी अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन बार सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजतापासून मत मोजणी केली जाईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी ड. उदय पद्माकर नाईक यांनी दिली. निवडणूक निर्णय अधिकारी ड. उदय नाईक यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय समिती स्थापन केली असून, त्यात ड. ए. जे. ठाकुर, ड. एस. एस. जोशी, ड. जी. डब्लु. पाठक, ड. ए. डी. देशपांडे, ड. एस. एम. खर्चे, ड. डी. एम. शुक्ला यांचा समावेश आहे.

**१६०७ मतदार** – अकोला बार असोसिएशनच्या सन २०२६–२७ वार्षिक निवडणुकीसाठी एकूण एक हजार ६०७ मतदार वकील आहेत. त्यामध्ये ३५४ महिला अधिवक्ता मतदार असून एक हजार २५३ पुरुष अधिवक्ता मतदार असल्याची माहिती देण्यात आली.

# मेळघाटाच्या डोंगरदऱ्यांत रंगला जिल्हा प्रशासनाचा 'ट्रेकिंग' अनुभव

## ऐतिहासिक गाविलगड किल्ल्याची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**
जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज, दि. ७ फेब्रुवारी रोजी गाविलगड किल्ल्याची पाहणी आणि पदभ्रमंती केली. त्यासोबतच जिल्हाधिकारी यांनी मोझरी पॉंईट येथून गाविलगड किल्ला पायी चढण्याचा अनुभव घेतला. त्यांनी सुमारे सहा किलोमीटर ट्रेकिंग करत दरीतून चढण्याचा थरारक अनुभव घेतला.जिल्ह्यातील प्रशासकीय कामाचा ताण हलका करण्यासाठी आणि निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे हा उपक्रम राबवण्यात आला. जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी या विशेष 'ट्रेकिंग' मोहिम घेण्यात आली. निसर्गाच्या कुशीत एक अविस्मरणीय प्रवास असलेला 'मेळघाट ट्रेकिंग अनुभव' या मोहिमेत सहभागी झालेल्यांना मेळघाटातील घनदाट जंगले आणि हिरव्यागार दऱ्यांचा थरार जवळून अनुभवता आला. या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट निसर्गाशी नाते जोडणे आणि दैनंदिन कामातून थोडा विरंगुळा मिळवणे असा होता.आज सकाळी ६ वाजता मोझरी गावातून पदभ्रमंतीला सुरुवात करण्यात आली. सहभागी पदभ्रमंती करून सकाळी ९ वाजता किल्ल्यावर



पोहोचले. यावेळी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी गाविलगड किल्ल्याचा इतिहास, भौगोलिक रचना व संवर्धनाबाबत सविस्तर माहिती घेतली.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह अचलपूरचे उपविभागीय अधिकारी बळवंत अरकराव, उपवनसंरक्षक अग्रिम सैनी, चिखलदऱ्याचे तहसीलदार जीवन मोराणकर, अचलपूरचे तहसीलदार सुदर्शन सहारे, जिल्हा प्रशासन अधिकारी विकास खंडारे, चिखलदराचे नायब तहसीलदार सुधीर धावडे, प्रवीण काळे व तुषार बुरघाटे, चिखलदरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धीरज गोहाळ, सहायक वनसंरक्षक अक्षय तळपे, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. युवनाते, वनपाल विनोद कासदेकर, वनरक्षक मयूर सानप, श्री. मलवार, श्री. बोरकर, मनीष ढाकुलकर उपस्थित यांनी मोहिमेत सहभाग नोंदविला. या मोहिमेचे नियोजन विभागीय वन अधिकारी अनंत डिगोळे यांनी केले.मेळघाटच्या कुशीत हरवायला, निसर्गाशी नाते जुळवायला आणि आठवणींचा ठेवा जमवायला हा एक सुवर्णक्षण असल्याची भावना सहभागींनी नोंदविली. यावेळी शिवा काळे यांनी गाविलगड किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा, महत्त्व व संरक्षणाची गरज याबाबत सविस्तर माहिती दिली. ही पदभ्रमंती ऐतिहासिक वारसा जतन व पर्यटन विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली.

# बाजार समितीत तुरीची आवक वाढताच दरात एक हजाराने घसरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती–** आठ दिवसांपूर्वी तुरीला उच्चांकी ९२०० रुपये क्विंटल असा दर मिळाला होता. आता दोन दिवसात बाजार समित्यांमध्ये नव्या तुरीची आवक वाढली व तुरीमध्ये आर्द्रता जास्त असल्याने दरात घसरण झालेली आहे. शुक्रवारी येथील बाजार समितीमध्ये नव्या तुरीला ७००० ते ८००० रुपये दर मिळाला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.बाजारात तुरीची कमी झालेली आवक व त्यातच देशातंर्गत तुरीचेसरासरी उत्पादनात येत असलेली घट, मिलद्वारे मागणी, सणासुदीत वाढलेली डाळीची मागणी व परदेशातील 'लेमन' तुरीच्या उत्पादकतेत कमी यासह अन्य कारणांमुळे जानेवारीपासून तुरीच्या दरात वाढ होण्यास सुरुवात झाली. मागच्या आठवड्यात तुरीला उच्चांकी ९२०० रुपयांपर्यंत भाव




मिळाला होता. याचा शेतकऱ्यांजवळ साठवणुकीतील तूर नसल्याने फायदा व्यापाऱ्यांना मिळाला आहे. यंदा तुरीला ८ हजार रुपये क्विंटल असा हमीभाव जाहीर झालेला आहे. याच दरम्यान सध्याही तुरीचे भाव सध्या स्थिरावले आहे.

# नांदगाव खंडेश्वर पाणी परीक्षण केंद्र स्थलांतरणाला विरोध:तालुक्यावर अन्याय

## मुख्यमंत्र्यांकडे तक्रार, तीव्र आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नांदगाव खंडेश्वर–**
जिल्हा परिषदेचे नांदगाव खंडेश्वर येथील पाणी परीक्षण व गुणवत्ता तपासणी केंद्र इतरत्र स्थलांतरित करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या हालचालींना स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध दर्शवला असून, हा तालुक्यावर अन्याय असल्याचे म्हटले आहे. नागरिकांनी हे केंद्र हलवण्याचा प्रयत्न झाल्यास तो हाणून पाडू आणि तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा दिला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आगाऊ तक्रारही दाखल करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेअंतर्गत असलेले हे केंद्र पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर परिसरात आहे. मात्र, अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या केंद्राला पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीत जागा उपलब्ध करून देण्यात आली नाही. केंद्रासाठीची जागा अधिकाऱ्यांच्या निवासस्थानासाठी देण्यात आल्याने आता जागा अपुरी असल्याचे कारण पुढे केले जात आहे. पूर्वी हे कार्यालय अमरावती जिल्हा परिषदेत होते. अमरावती आणि नांदगाव खंडेश्वरमधील सुमारे ३५ किलोमीटरच्या अंतरामुळे तालुक्यातील नागरिकांना पाणी परीक्षणासाठी मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे नागरिकांनी व तत्कालीन लोकप्रतिनिधींनी अनेक निवेदने व आंदोलने करून हे केंद्र नांदगाव खंडेश्वर येथे मंजूर करून आणले होते. सध्या या केंद्राचा



लाभ तालुक्यातील १६१ खेडे–गावे आणि ५८ ग्रामपंचायतींना होत आहे. या केंद्रामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात सोय झाली आहे. नांदगाव खंडेश्वर तालुका आधीच विकासाच्या बाबतीत मागासलेला असल्याने, हे महत्त्वाचे केंद्र इतर तालुक्यात हलवणे म्हणजे विकासावर आणखी एक घाला असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः लक्ष घालून पाणी परीक्षण व गुणवत्ता तपासणी केंद्र नांदगाव खंडेश्वर येथेच सुरू ठेवण्याचे स्पष्ट आदेश अमरावती जिल्हा परिषदेच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मोरेश्वर दिवटे यांनी केली आहे.या निवेदनाच्या प्रती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी यांनाही देण्यात आल्या आहेत. अन्यथा याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

# रासायनिक खत-कीटकनाशकांची मिक्सिंग पिकांसाठी घातक परिणाम शून्य तर कधी उलट - कृषी विभागाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**



शेतीमध्ये रासायनिक खते, कीटकनाशके, बुरशीनाशके व तणनाशकांचा वाढता वापर होत असताना, तांत्रिक माहितीशिवाय औषधांची मिक्सिंग करणे पिकांसाठी गंभीर धोका ठरू शकते, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे. चुकीच्या पद्धतीने औषधे एकत्र मिसळल्यास अपेक्षित परिणाम न मिळता फवारणीचा परिणाम शून्य होण्याची, तसेच पिकांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता अधिक असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.वेळ, मजुरी आणि खर्च वाचवण्यासाठी अनेक शेतकरी एकाच फवारणीत दोन-तीन औषधे मिसळतात. मात्र, सर्व रासायनिक खते व कीटकनाशके एकमेकांशी सुसंगत नसतात. काही औषधे एकत्र केल्यास त्यांच्यात रासायनिक प्रतिक्रिया होऊन मिश्रण गरम होते, दही पडते किंवा साका तयार होतो. अशा मिश्रणाची फवारणी केल्यास पिकांची पाने जळणे, वाढ खुंटणे, उत्पादन घटणे यासारखे गंभीर परिणाम दिसून येतात.कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार फवारणी करताना योग्य क्रम पाळणे अत्यंत आवश्यक आहे. प्रथम पाणी, त्यानंतर विद्राव्य खते, मग भुकटी स्वरूपातील औषधे, नंतर प्रवाही औषधे आणि शेवटी द्रव औषधे मिसळावीत. बोर्डो मिश्रण हे नेहमी स्वतंत्रपणे फवारावे. त्यासोबत कोणतेही कीटकनाशक मिसळणे अत्यंत धोकादायक ठरू शकते, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला आहे.औषधांची भेसळ हा शेतीसाठी अत्यंत संवेदनशील विषय असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे. तांत्रिक माहितीशिवाय केलेली मिक्सिंग केवळ आर्थिक नुकसानच करत नाही, तर मातीची सुपीकता, पिकांचे आरोग्य आणि पर्यावरणालाही धोका निर्माण करते. त्यामुळे याबाबत शेतकऱ्यांमध्ये अधिक जागृती करणे गरजेचे असल्याचे कृषी विभागाने नमूद केले आहे.दोन औषधे एकत्र वापरता येतील की नाही, याबाबत शंका असल्यास 'जार टेस्ट' करणे आवश्यक आहे. छोट्या बाटलीत पाणी घेऊन संबंधित औषधे मिसळून पाहावीत. मिश्रण गरम होणे, दही पडणे, साका साचणे किंवा रंग अचानक बदलणे, अशी लक्षणे दिसल्यास ते मिश्रण फवारणीसाठी वापरू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. लेबलवरील सूचना आणि कृषी तज्ज्ञांचा सल्ला घेतल्याशिवाय कोणतीही मिक्सिंग करू नये, असा सल्लाही देण्यात आला आहे.तज्ज्ञांच्या माहितीनुसार, बहुतेक कीटकनाशके व बुरशीनाशके एकत्र वापरता येतात. १९:१९:१९ सारखी विद्राव्य खते कीटकनाशकांसोबत दिल्यास पिकांची वाढ व संरक्षण एकाच वेळी मिळते. बुरशीनाशकांसोबत अमिनो ॲसिड किंवा ह्युमिक ॲसिड दिल्यास पिकांना रोगातून सावरण्यास मदत होते. मात्र, सल्फरसोबत कोणतेही तेलयुक्त औषध किंवा निम तेल वापरल्यास पाने करपण्याचा धोका असतो.तसेच, ब्ल्यू कॉपर व कोसाईड ही औषधे विद्राव्य खते (एनपीके) किंवा अँटीबायोटिक्ससोबत मिसळू नयेत. कॅल्शियम नायट्रेट व सल्फेटयुक्त किंवा फॉस्फरसयुक्त खते एकत्र केल्यास साका तयार होऊन ठिबक सिंचन प्रणाली चोकअप होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य माहिती घेऊनच फवारणी करावी, असे कृषी विभागाने आवाहन केले आहे.

# कुष्ठरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो; गैरसमज दूर करा - डॉ. रुपेश खडसे

## नूरनगर येथे स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून योग्य वेळी उपचार घेतल्यास तो पूर्णपणे नाहीसा होतो, असे प्रतिपादन मनपा आरोग्य विभागाचे साथरोग नियंत्रण अधिकारी डॉ. रुपेश खडसे यांनी केले. महानगरपालिकेच्या पठाण चौक शहरी आरोग्य केंद्राअंतर्गत अंजुमन-इ-ख्याल उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळा, नूरनगर येथे स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.मनपा आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे व जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शरद जोगी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षीय भाषणात डॉ. खडसे यांनी कुष्ठरोग हा पुण्य-पापामुळे होत नसून मायकोबॅक्टेरियम लेप्री या जंतूमुळे होतो, असे स्पष्ट केले. फिकट लाल चट्टे व संवेदना नसल्यास तात्काळ मनपाच्या आरोग्य केंद्रात तपासणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. तपासणी व औषधोपचार पूर्णतः मोफत असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कुष्ठरोग व कीटकजन्य आजार निर्मूलनाची शपथ घेतली.

# उपोषणाचा सहावा दिवस प्रकृती खालावण्याच्या मार्गावर


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अचलपूर**



अचलपूर तालुक्यातील सरकारी जमिनीवरील नियमबाह्य अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी पंचायत समितीसमोर सुरू असलेले उपोषण सोमवारी सहाव्या दिवशीही सुरूच होते. उपोषणकर्त्यांच्या समर्थनार्थ जनुना व वाघडोह येथील शेकडो नागरिकांनी पंचायत समितीवर धडक दिली.तीन उपोषणकर्त्यांची प्रकृती गंभीर होण्याच्या मार्गावर असल्याने प्रशासनाने चर्चा करण्याचा प्रयत्न केला. मात्र उपोषणकर्ते आपल्या मागण्यांवर ठाम राहिले. रविवारी नागरिकांनी पंचायत समितीच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करत घोषणाबाजी केली.गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी महादेव कासरेकर, ग्रामपंचायत सचिव झाडे व पोलिस कर्मचारी उपस्थित राहून चर्चा झाली; मात्र कोणताही ठोस तोडगा न निघाल्याने उपोषण सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.जानेवारी व फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात अतिक्रमण काढण्याबाबत ग्रामपंचायतीत ठराव मंजूर झाला होता, मात्र अंमलबजावणी न झाल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. तहसील कार्यालयात बीडीओ व प्रतिनिधींमध्ये तीन तास चर्चा होऊनही समाधानकारक निष्कर्ष न निघाल्याने, न्याय न मिळाल्यास मंत्रालयात पायदळ जाण्याची भूमिका उपोषणकर्त्यांनी मांडली आहे. वृत्त लिहीपर्यंत उपोषण सुरूच होते.

# पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले; गव्हाची पेरणी सापडली संकटात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९पथ्रोट**



पथ्रोट भाग क्रमांक दोन अंतर्गत येणाऱ्या शिंदी मायनरवरील शेतकरी सध्या गंभीर संकटात सापडले असून, पाटबंधारे विभागाच्या निष्काळजीपणामुळे गव्हाची पेरणी धोक्यात आली आहे. पाणी उपलब्ध असूनही विभागाने होकार देऊनसुद्धा पाणी न सोडल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.शिंदी मायनरवरील शेतकऱ्यांनी गहू पिकासाठी पाणी मिळावे, यासाठी २७ जानेवारी रोजी लघु व मध्यम पाटबंधारे उपविभाग क्रमांक १, अचलपूर येथे रीतसर अर्ज सादर केला होता. या अर्जावर विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद देत तुम्ही पेरणी करा, पाणी सोडण्यात येईल, असे आश्वासन मोजणीदार राजेश डिके यांच्याकडून देण्यात आले. या आश्वासनावर विश्वास ठेवून विजय गभने, मोहम्मद शरीफ मोहम्मद सलाम, प्रेमदास उके, सुनील दमाहे, प्रदीप डवरे, रहमान अली वायाद अली, राजू गोरले, गजानन मडगे, विलासराव कोकाटे, गजानन चराटे, अब्दुल मतीन अब्दुल सलाम, मोहम्मद बिस्मिल्ला, निरार शेख, पुरुषोत्तम वानखडे, प्रकाश कोकाटे, शेख अयुब शेख युनूस, नारायण काळे, रमेश नेवारे, बाळू रणगिरे व उमेश नळकांडे आदी शेतकऱ्यांनी गव्हाची पेरणी केली.मात्र पेरणी झाल्यानंतर प्रत्यक्षात पाणी सोडण्याच्या बाबतीत पाटबंधारे विभागाकडून कोणतीही ठोस हालचाल करण्यात आली नाही. पाण्याची उपलब्धता असूनही कालव्यामधून पाणी सोडण्यात आले नाही. त्यामुळे अंकुरलेल्या गव्हाच्या पिकाला तातडीने पाण्याची आवश्यकता असताना शेतकरी अडचणीत सापडले आहेत.या संदर्भात शेतकऱ्यांनी वारंवार विभागाकडे विनंती केली असता, कालव्याच्या शेवटच्या टोकावरील एका शेतकऱ्याने पाटसरी मोकळी करून देण्यास नकार दिल्याचे कारण पुढे करत पाणी सोडण्यास टाळाटाळ करण्यात आली. मात्र प्रत्यक्ष पाहणीत शिंदी मायनरवरील कालवा एका ठिकाणी पूर्णतः फुटलेला असल्याचे निदर्शनास आले. काही ठिकाणी कालवा स्वच्छ करण्यात आलेला असला तरी मधल्या भागात सिमेंट पाईपजवळ झाडझुडपांनी कालवा बुजलेला आहे. पाईपद्वारे पुढे काढण्यात आलेल्या पाण्याला मोठ्या प्रमाणात गळती लागत असून, नादुरुस्त अवस्थेतील कालवा दुरुस्त न करता पाणी सोडण्यात आले असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.पाटबंधारे विभागाच्या आश्वासनानुसार आम्ही गव्हाची पेरणी केली. आता पाणी नसल्याने मोठी चिंता निर्माण झाली आहे. सरकारी कामात अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी भास्कर कानडे (शेतकरी, पथ्रोट भाग क्रमांक दोन) यांनी केली आहे.दरम्यान, कालव्यावरील एका शेतकऱ्याने साफसफाईस मनाई केल्याने पाणी सोडणे थांबविण्यात आले आहे. मागणीच्या ठिकाणापर्यंत पाणी पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे स्पष्टीकरण मोजणीदार राजेश डिके यांनी दिले असले तरी हा प्रकार संशयास्पद असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे.या गंभीर प्रकरणात लोकप्रतिनिधींनी तातडीने हस्तक्षेप करून मार्ग काढावा, अन्यथा गव्हाचे पीक पूर्णतः धोक्यात येईल, अशी एकमुखी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# सारडा महाविद्यालयातील चार प्राध्यापकांविरुद्ध गुन्हा दाखल

## प्राचार्यांनी केली पोलिसांत तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अंजनगाव सुर्जी :**

श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्राध्यापकांविरुद्ध पोलिसांत तक्रार केली. तक्रारीवरून पोलिसांनी चार प्राध्यापकांवर गुन्हा दाखल केल्याने शिक्षणवर्तुळात खळबळ उडाली आहे.

प्राचार्य वशिष्ठ चौबे यांनी पोलिसांत अंजनगाव महाविद्यालयाच्याच प्राध्यापकांनी गोंधळ घातल्याची तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार ३१ जानेवारी २०२६ च्या आदेशानुसार ते प्राचार्य म्हणून महाविद्यालयाचा कारभार पाहत आहेत. प्रा. डॉ. सत्येंद्र गडपायले, प्रा. डॉ. चंद्रशेखर वडाळे, प्रा. डॉ. अनिकेत भुयार हे महाविद्यालयात उशिरा आल्याच्या कारणावरून विचारणा केली असता त्यांनीशिवीगाळ केली. प्रा. नितीन सराफ यांनीही गोंधळ घातला. या सर्व प्रकारामुळे महाविद्यालयातील शांतता बाधित झाली असून, वर नमूद प्राध्यापकांपासून माझ्या जिवाला धोका आहे. झालेल्या प्रकाराची चौकशी करण्यात यावी, असे तक्रारीत नमूद होते. तक्रारीवरून पोलिसांनी चारही प्राध्यापकांवर बीएनएसच्या कलम १३१,३५२, ३५१ नुसार गुन्हा दाखल करून चौकशी सुरू केली आहे. तालुक्यातील अत्यंत प्रतिष्ठित महाविद्यालय म्हणून सारडा महाविद्यालयाची ख्याती आहे; मात्र काही काळापासून तेथील प्रशासकीय यंत्रणा व संस्था पदाधिकारी यांच्यात बेबनाव निर्माण झाला असून, त्यातूनच हे प्रकरण आता थेट पोलिसांत पोहोचले आहे.

# झेडपीत 'फेस अटेन्डन्स' लागू; उशिरा येणाऱ्यांची आता खैर नाही





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

कर्मचाऱ्यांच्या लेटलतिफ तसेच वेळेपूर्वी घरी जाण्यावर आळा घालण्याकरिता आता झेडपी प्रशासनाने फेस अटेन्डन्सचा पर्याय शोधला आहे. त्यामुळे वेळेवरच कार्यालयात पोहोचून कर्मचाऱ्यांना ऑनलाईन फेस अटेन्डन्स द्यावे लागणार आहे. अन्यथा लेटमार्क मिळणार आहे. याची पहिल्या टप्प्यात मुख्यालयातील सर्वच विभागात सुरू करण्यात आली असून मार्चमध्ये पंचायत समितीस्तरावर फेस अटेन्डन्स सुरू होणार आहे.मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हापरिषद अमरावती अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची दैनंदिन उपस्थिती आता फेस अटेंडन्स ॲपव्दारे ऑनलाईन नोंदविणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासंदर्भात सीईओ संजिता मोहपात्रा यांच्या आदेशावरून जिल्हापरिषदेच्या सामान्य प्रशासनविभागाने परिपत्रक जारी केले असून फेब्रुवारीपासून मुख्यालयाच्या पंचायत सामान्य प्रशासन शिक्षणविभागाने परिपत्रक जारी केले असूनग्रामीण पाणीपुरवठा, बांधकाम, जलसंधारण, पशुसंवर्धन आदी सर्वच विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना ऑनलाईन पध्दतीने फेस अटेन्डन्स नोंदविण्याची सक्ती करण्यात आली आहे.याची अंमलबजाणी सुरू करण्यात आली असून तालुकास्तरावर पंचायतसमिती अंतर्गत सर्व कार्यालयांमध्ये मार्चपासून अंमलबजावणी सुरू होणार आहे. त्यामुळे सकाळी ९.४५ वाजता कर्मचाऱ्यांना मोबईलवरून फेस अटेंडन्स द्यावे लागणार आहे, तर सायंकाळी ६. १५ वाजतादेखील घरी जाण्याचे अटेंडन्स याच पध्दतीने दिले जाणार आहे. याकरिता पगआर्च ॲप वापरण्यात येणार असून सदर ॲप कर्मचाऱ्यांच्या मोबाईलमध्ये इन्स्टॉल करण्यात आले आहे.

# भारवाडी आश्रम शाळेतील विद्यार्थिनीची इस्रो भेटीसाठी निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ तिवसा**



तिवसा येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत खाजगी अनुदानित विजाभाज निवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधनाची माहिती मिळावी, विज्ञान विषयात गोडी निर्माण व्हावी तसेच इस्रोच्या यशोगाथेतून वैज्ञानिक जाणीव वाढावी, या उद्देशाने राज्यस्तरीय विशेष परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेतून राज्यातील १०० विद्यार्थ्यांची इस्रो भेटीसाठी निवड करण्यात आली.या परीक्षेत तिवसा तालुक्यातील भारवाडी येथील श्री संत सत्यदेव बाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील इयत्ता नववीची विद्यार्थिनी कु. आर्या विष्णुदास वाढई हिने आपल्या बुद्धिमत्ता, सातत्यपूर्ण परिश्रम आणि विज्ञान विषयातील सखोल अभ्यासाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत इस्रो भेटीसाठी निवड मिळवली आहे.विशेष बाब म्हणजे, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील आश्रम शाळांमधून झालेली ही एकमेव निवड ठरली आहे. त्यामुळे भारवाडी गावासह संपूर्ण तिवसा तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे.या यशामागे विज्ञान शिक्षक श्री गाडेकर सर, वर्गशिक्षक तिवारी सर तसेच शाळेतील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. या निवडीबद्दल प्रियदर्शनी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष अण्णासाहेब उंद्रे, उपाध्यक्ष सिद्धांत भाऊ उंद्रे, प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक देवरे सर, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक गाडेकर सर तसेच शिक्षकवृंद, अधीक्षक, अधीक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कु. आर्या हिचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# शिवविचारांना कृतीतून अभिवादन; अभाविपचा 'एक रविवार राष्ट्रासाठी' उपक्रम - ऐतिहासिक स्थळांची स्वच्छता मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अचलपूर**



छत्रपती शिवाजी महाराजांच्या राष्ट्रनिर्मितीच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीतून अभिवादन करण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) अचलपूर-परतवाडा यांच्या वतीने 'एक रविवार राष्ट्रासाठी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या औचित्याने फेब्रुवारी २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी जुळ्या शहरातील ऐतिहासिक स्थळांची स्वच्छता मोहीम होणार आहे.या उपक्रमाची सुरुवात ५ फेब्रुवारी २०२६ रोजी परतवाडा येथील जयस्तंभ चौकातील शिवतीर्थ येथे करण्यात आली. यावेळी परिसरातील कचरा व प्लास्टिक संकलित करून स्वच्छता करण्यात आली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस हार अर्पण करून पूजन करण्यात आले.या अभियानात नगराध्यक्ष प्रा. अभय उधळीकर, नगर सहमंत्री प्रणव कबाडकर, जिल्हा कार्यालयीन मंत्री कार्तिक घोटेकार, अचलपूर नगर विस्तारक श्रीकांत गोवारकर यांच्यासह अभाविपचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.स्वच्छतेसोबतच संस्कारांची जपणूक, ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन व शिवविचारांप्रती कृतिशील श्रद्धा व्यक्त करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे अभाविपतर्फे सांगण्यात आले.

# 'गण गण गणात बोते'च्या गजरात फुलआमला दुमदुमले

## भव्य शोभायात्रा; हजारो भाविकांनी घेतला महाप्रसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नांदगाव खंडेश्वर**

तालुक्यातील फुलआमला येथील चवणे परिवार संचालित श्री संत गजानन महाराज मंदिरात प्रगट दिन उत्सव मोठ्या भक्तिभावात व उत्साहात साजरा करण्यात आला. प्रगट दिनानिमित्त काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेमुळे संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले होते. बँड, घोडा, पालखी व भजन मंडळींच्या सहभागाने निघालेल्या शोभायात्रेत 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने फुलआमला दुमदुमून गेले.चवणे परिवाराच्या यजमानपदाखाली पहाटे मंत्रोच्चारात महादेवराव चवणे, सुहासिनी चवणे, अमोल चवणे व सौ. रोहिणी चवणे यांच्या हस्ते श्री संत गजानन महाराजांचा अभिषेक व पूजा-अर्चा करण्यात आली. विविध भजन मंडळ्यांच्या भजनांनी परिसरात अखंड नामस्मरण सुरू होते.यानंतर आयोजित महाप्रसादाचा पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी भक्तिभावाने लाभ घेतला. भक्ती, सेवा व एकात्मतेचा संगम ठरलेल्या या प्रगट दिन उत्सवाने भाविकांच्या मनात श्रद्धा व समाधान निर्माण केले.

# मनपा स्थायी समितीचे अद्याप भिजत घोंगडे; कोणाकडे जाणार सभापतीपद?




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**


महानगरपालिका निवडणुकीला तब्बल २५ दिवस उलटून गेले असले, तरी अद्याप स्थायी समितीच्या सभापतीपदाबाबत निर्णय न झाल्याने राजकीय वर्तुळात संभ्रमाचे वातावरण कायम आहे. महापौरपद भाजपकडे, तर उपमहापौरपद युवा स्वाभिमान पक्षाकडे गेले आहे. मात्र, मनपाच्या आर्थिक कारभारावर थेट नियंत्रण असलेल्या स्थायी समितीच्या सभापतीपदाबाबत अजूनही स्पष्टता नसल्याने हे पद नेमके कोणाच्या वाट्याला जाणार, याकडे शहराचे लक्ष लागले आहे.महापौर व उपमहापौर निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ने सत्ताधाऱ्यांना पाठिंबा देत मतदान केले होते. विशेष म्हणजे, या पाठिंब्याच्या बदल्यात राष्ट्रवादीकडून कोणतीही उघड मागणी करण्यात आली नसल्याने राजकीय समीकरणे अधिकच गुंतागुंतीची बनली आहेत. शहरात सध्या राष्ट्रवादी काँग्रेसलाच स्थायी समितीचे सभापतीपद मिळणार, अशी जोरदार चर्चा सुरू आहे. मात्र, या चर्चांवर स्वतः राष्ट्रवादीचे प्रदेश संघटन आमदार संजय खोडके यांनी मौन बाळगले आहे.सत्तेत सहभागी होताना आम्ही कोणतीही अट घातलेली नाही, असे स्पष्ट करतानाच, मुख्यमंत्र्यांनी आम्हाला सर्वकाही व्यवस्थित मिळेल, असा शब्द दिला आहे, असे वक्तव्य त्यांनी केले. या वक्तव्यामुळे संभ्रम अधिकच वाढला आहे. मुख्यमंत्री जे ठरवतील त्यानुसार पुढील निर्णय घेतला जाईल, असा अर्थ यातून निघतो की, अप्रत्यक्षपणे स्थायी समितीचे सभापतीपद राष्ट्रवादीकडे यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे, हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या तर्कवितर्कांना उधाण आले आहे.दरम्यान, भाजप किंवा युवा स्वाभिमान पक्षानेही अद्याप उघडपणे सभापतीपदावर दावा केलेला नाही. यामुळेच हा विषय अधिकच प्रलंबित राहिला आहे. मनपाच्या तिजोरीची 'चावी' कोणाच्या हाती जाणार, यावरच आगामी विकासकामे, अर्थसंकल्पीय निर्णय आणि प्रशासनाची दिशा ठरणार असल्याने स्थायी समितीच्या सभापतीपदाला विशेष महत्त्व आहे.भाजपच्या शहरातील वरिष्ठ नेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी काही दिवसांत पालकमंत्री अमरावती शहरात येणार असून, त्यांच्या उपस्थितीत याबाबत अंतिम चर्चा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या सभापतीपदाचे भिजत घोंगडे कधी उतरणार, आणि नेमका कोण बाजी मारणार, याची उत्सुकता शहरवासीयांमध्ये कायम आहे.

# क्षयरोग जनजागृतीच्या नावाखाली ७५ हजारांचा 'मंडप घोटाळा'

## मनपा आरोग्य विभागात निधी दुरुपयोगाचा गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील कारभार पुन्हा एकदा संशयाच्या भोवऱ्यात सापडला असून, क्षयरोग जनजागृतीसाठी मिळालेल्या शासकीय निधीचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. केवळ एका दिवसाचा कार्यक्रम आणि १५ बाय १५ आकाराचा मंडप उभारून थेट ७० ते ७५ हजार रुपयांचे देयक कंत्राटदाराच्या खात्यात जमा करण्यात आल्याची तक्रार ४ फेब्रुवारी २०२६ रोजी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्याकडे करण्यात आली आहे. त्यामुळे 'सार्वजनिक आरोग्य' या संवेदनशील विभागात निधीचा कसा बेमालूम वापर होतो, याचेच हे जिवंत उदाहरण असल्याची चर्चा शहरात सुरू आहे.राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत अमरावती महानगरासाठी १०० दिवसांचा विशेष उपक्रम राबविण्यासाठी तब्बल ९ लाख ७१ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून महापालिकेच्या दवाखान्यांमध्ये व्यापक जनजागृती, तपासण्या आणि मार्गदर्शन अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात हा संपूर्ण कार्यक्रम एका व्यक्तीला कंत्राट देऊन केवळ एकाच दिवसापुरता मर्यादित ठेवण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.तक्रारीनुसार, त्या एकमेव दिवशीही फक्त १५ बाय १५ चा मंडप उभारण्यात आला. शहरातील इतर भागात किंवा महापालिकेच्या दवाखान्यांमध्ये कोणतीही ठोस क्षयरोग जनजागृती करण्यात आली नाही. तरीसुद्धा, 'कॅम'च्या सांगण्यावरून कंत्राटदाराच्या खात्यात थेट ७० ते ७५ हजार रुपयांचे देयक टाकण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. म्हणजेच, कार्यक्रम कागदोपत्री राबवून निधी खर्च दाखविण्यात आला का, असा थेट सवाल उपस्थित झाला आहे.या तक्रारीची वेळही तितकीच महत्त्वाची ठरते. महापौर श्रीचंद तेजवानी व उपमहापौर सचिन भेंडे यांच्या निवडणुकीच्या अवघ्या दोन दिवस आधी ही तक्रार आयुक्तांकडे दाखल करण्यात आली. त्यामुळे या प्रकरणामागे केवळ आर्थिक गैरव्यवहारच नव्हे, तर प्रशासकीय दुर्लक्षाचाही मोठा प्रश्न उभा राहतो आहे.विशेष म्हणजे, काही महिन्यांपूर्वीच महापालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागात बनावट दाखल्यांचे प्रकरण उघडकीस आले होते. त्या प्रकरणात निबंधक व उपनिबंधकांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या होत्या आणि अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. ते प्रकरण ताजे असतानाच आता आरोग्य विभागातच शासकीय निधी दुरुपयोगाचा नवा स्फोट झाल्याने मनपा प्रशासनाची विश्वासार्हता पुन्हा प्रश्नांकित झाली आहे.शहरवासीयांमध्ये आता एकच मागणी जोर धरू लागली आहे या प्रकरणाची स्वतंत्र आणि सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अन्यथा 'जनतेच्या आरोग्याच्या नावाखाली लुट' होतच राहणार.



सार्वजनिक आरोग्य विभागाविषयी झालेली तक्रार अद्याप माझ्याकडे आलेली नाही. तक्रारीतील नेमका मजकूर तपासल्यानंतरच यावर प्रतिक्रिया देता येईल.

**डॉ. विशाल काळे,**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी.**

# हिवाळा ओसरला, वाढल्या उन्हाच्या झळा, आरोग्य सांभाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

हिवाळा ओसरताच जिल्ह्यात उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. अचानक वाढलेला उष्णतेचा पारा आणि बदलत्या हवामानाचा फटका जिल्हावासियांच्या आरोग्याला बसत आहे. सर्दी, खोकला, ताप आणि अंगदुखीच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत असून, दहावी-बारावीच्या परीक्षा मंगळवारपासून सुरू होत आहे. विद्यार्थ्यांसमोर आरोग्याचे मोठे संकट उभे राहिले आहे. वैद्यकीय तज्ज्ञांनी पालकांना व विद्यार्थ्यांना सतर्क राहण्याचे आवाहनकेले आहे.

अमरावती जिल्ह्यात सध्या दिवसा ऊन व रात्री गारवा असा विषम वातावरण आहे. पुढील दिवसांत कमाल तापमान २९-३० अंशांवरून ३२-३५ अंशांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. या बदलांमुळे शरीर लवकर थकते. डोकेदुखी, पचनाचे विकार वाढत आहेत.

**आरोग्य राखण्यासाठी अशी घ्या काळजी**

भरपूर पाणी प्या : दिवसभरात पाणी, ताक किंवा लिंबू सरबत घ्या. शरीरातील



पाण्याचे प्रमाण टिकवा.

पौष्टिक आहार : तेलकट, जंक फूड टाळा. घरगुती हलका आहार, फळे आणि हिरव्या भाज्या घ्या.

पुरेशी झोप : रात्री ७-८ तास झोप घ्या. मेंदूची कार्यक्षमता वाढेल. व्यायाम व विश्रांती : हलका व्यायाम करा, तणाव कमी करण्यासाठी ध्यान धरा. आरोग्य चांगले राहिले तरच अभ्यास आणि परीक्षेत यश मिळेल, असा संदेश तज्ज्ञांनी दिला आहे.

**पालकांचा संवाद व मानसिक आधार महत्वाचा**

पालकांनी मुलांवर अभ्यासाचा दबाव टाकू नये, त्यांच्याशी संवाद साधून मानसिक आधार द्यावा. अभ्यासामध्ये विश्रांती घेण्यास प्रोत्साहन द्यावे आणि घरातील वातावरण सकारात्मक ठेवावे, असे डॉक्टरांचे मत आहे.

# स्मार्ट मीटरविरोधकांना नोटीसांचा धाक; नोटीसवर 'अधिकारीच बेपत्ता'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

स्मार्ट मीटर लावण्याससहकार्य न केल्यास त्याचा विद्युत पुरवठा खंडित करण्याचा तसेच शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. परंतु, या नोटीसवर कोणत्याही प्रकारचे अधिकृत अधिकाऱ्याचे नाव, कार्यालयीन पत्ता नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

महावितरणकडून वर्षभरापासून वीज ग्राहकांना स्मार्ट (टीओडी) मीटर लावण्यास सुरुवात केली आहे. ग्राहक तसेच विविध संघटनांकडूनदेखील या स्मार्ट मीटरला विरोध होत आहे. अशाही परिस्थितीमध्ये जिल्ह्यात



महावितरणने अमरावती १ लाख ८६ हजारांपेक्षा अधिक ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहे. जिल्ह्यात हे स्मार्ट मीटर बसविण्याचे काम जीनस कंपनीला देण्यात आले आहे.

कंपनीचे कर्मचारी संबधित ग्राहकांना कोणतीही पूर्व सूचना न देता मीटर बदलविण्याचे काम करत आहेत. त्यामुळे अशातच ज्या ग्राहकांकडून त्यांना विरोध होत आहे. त्यांना संबंधित कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून महावितरणच्या नावाची नोटीस दाखविण्यात येत आहे. परंतु, सदर नोटीसवर अधिकृत कोणत्याही अधिकाऱ्याची सही तसेच कार्यालयाचा पत्ता व शिक्का नाही. तसेच ग्राहकांना कोणतीही पूर्व सूचना न देता मीटर न बदलण्याच्या सूचना असतानादेखील याचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे.

# १०, १२ वी परीक्षेत केंद्र संचालक पर्यवेक्षक स्थानिकच राहणार

## सीसीटीव्ही नसलेल्या ठिकाणी बाहेरचे शिक्षक

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**



दहावी व बारावी बोर्डाच्या परीक्षेत पर्यवेक्षणासाठी सर्व शिक्षक अदलाबदलीचा निर्णय राज्य शिक्षण मंडळाने अखेर स्थगित केला आहे. त्यामुळे सर्व शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला असून, या निर्णयाचे संघटनांनी स्वागत केले आहे. दरम्यान, नव्या निर्णयानुसार परीक्षा केंद्र संचालक पर्यवेक्षक स्थानिकच अर्थात त्याच शाळेचे राहणार आहेत.उद्या १० फेब्रुवारीपासून बारावीची, तर २० फेब्रुवारीपासून दहावीची परीक्षा सुरू होणार आहे. परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात यासाठी शासनाने अनेक उपाययोजना सुचवल्या होत्या. त्या अनुषंगाने राज्य मंडळांनीसुद्धा फेब्रुवारी २०२६ मधील दहावी, बारावीच्या परीक्षा परीक्षेवर ऑनलाइनद्वारे थेट नियंत्रण राहणार पर्यवेक्षकांच्या मोबाइल झुम ॲपद्वारे आहे.घेण्याकरिता विविध उपाययोजना आखल्या होत्या. यामध्ये प्रामुख्याने केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे आवश्यक केले होते. शिवाय केंद्र संचालक व पर्यवेक्षणाच्या कामासाठी शिक्षकांची सरसकट अदलाबदल करण्याचा निर्णय घेतला होता. कॉपीमुक्त अभियानाकरिता ज्या विविध सूचना आल्या त्यामध्ये नेहमीच्या सूचनेव्यतिरिक्त शिक्षक आंतर बदलाची सूचना पहिल्यांदा आली होती. त्यामुळे शिक्षक संघटनांकडून या सूचनेला विरोध करण्यात आला. त्यानंतर राज्य मंडळाकडे संघटनेच्या सभासुद्धा घेण्यात आल्या. त्यानंतर दहावी व बारावी परीक्षांकरिता सर्व कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्याचा निर्णय मागे घेण्याचे निर्देश विभागीय मंडळाला देण्यात आले आहेत. शिक्षक संघटनांकडून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे.

**सीसीटीव्ही नसलेल्या ठिकाणी बाहेरचे शिक्षक**

ज्या ठिकाणच्या परीक्षा केंद्रांवरील सर्व खोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व्यवस्था नाही, केवळ अशाच मोजक्या शाळांमध्ये जुन्या निर्णय पद्धतीचा उपयोग करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे अशा शाळांच्या परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक व पर्यवेक्षक म्हणून बाहेरच्या शाळेतील शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

**शिक्षण विभागाकडून परीक्षा केंद्रांचे नियोजन**

बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. केवळ तीन दिवसच शिल्लक असल्याने परीक्षा केंद्रांच्या नियोजनाची धावपळ माध्यमिक शिक्षण विभागाकडून सुरू झाली आहे. जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांचा आढावा अधिकाऱ्यांकडून घेतला जात आहे. काही केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील सुविधांची पाहणी केली जात आहे, तसेच कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा व्हावी यासाठी केंद्रप्रमुखांसह इतर कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

# ठाकरेंचा उमेदवार अवघ्या एका मताने विजयी

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ९ धाराशिव**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा व १२५ पंचायत समित्यांसाठी शनिवारी (७ फेब्रुवारी) मतदानाची प्रक्रिया पार पडली. आज (९ फेब्रुवारी) निवडणुकांचे निकाल जाहीर होत आहे. धाराशिव जिल्हा परिषदेत भाजपसह राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदे गट, ठाकरे गट यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. धाराशिवमध्ये भाजपाचे आमदार राणा जगजितसिंह पाटील, ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर आणि शिंदे गटाचे आमदार आणि माजी मंत्री तानाजी सावंत यांनी जोरदार प्रचार केला होता. त्यामुळे जिल्ह्यात नेमके काय होणार याचीच उत्सुकता अनेकांना लागून होती. अखेर धाराशिवमधील विजयी उमेदवारांची यादी समोर आली आहे.

धाराशिव जिल्हा परिषदेअंतर्गत एकूण ५५ जिल्हा परिषद प्रभाग आहेत. तसेच जिल्ह्यातील ८ पंचायत समित्यांमध्ये एकूण ११० प्रभागांचा समावेश आहे. २०११ च्या जनगणनेनुसार धाराशिव जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १,६५७,५७६ इतकी आहे.

# वर्ध्याच्या बाजारपेठेत ५०० अन १०० च्या बनावट नोटा

## बँकेतील मशीनने केली पोलखोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९आर्वी (वर्धा)**

आर्वी शहरातील बाजारपेठेत ५०० आणि १००च्या बनावट नोटा आढळल्याने खळबळ उडाली आहे. येथील अगरबत्ती व्यावसायिकाला वसुलीत या नोटा देण्यात आल्या होत्या.

अभिजित भिवगडे यांनी शनिवारी बाजारपेठेत दहा हजारांच्या अगरबत्तीची उधारी वसुली केली. त्यात एका दुकानदाराने ५०० रुपयांची बनावट नोट दिली. भिवगडे यांनी बँकेत भरणा करण्यासाठी मशीनमध्ये १४ हजार ५०० रुपये टाकले. मात्र, मशीनने पाच वेळा ५०० ची एक नोट बाहेर फेकली. त्यावरून ती बनावट असल्याचे पडताळणीत आढळले.




बाजारात एका व्यावसायिकाने उधारी वसूल करताना पाचशेची नोट दिली. बँकेत भरणा केला असताना ती बनावट असल्याचे आढळले. बँकेने ती नोट बनावट असल्याने त्यावर लाल क्रॉस मारली. त्यात माझे पाचशे रुपयांचे नुकसान झाले.

**– अभिजित भिवगडे, अगरबत्ती व्यावसायिक, आर्वी**

# अमरावतीत एम.डी. ड्रग्स, गुटखा व ट्रॅफिक समस्यांवर कॉँग्रेस आक्रमक

## १५ नगरसेवकांची पोलिस आयुक्तांशी भेट, कठोर कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

अमरावती शहरात युवकांमध्ये वाढत असलेला एम.डी. ड्रग्सचा वापर, गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा अवैध व्यवसाय आणि गंभीर बनलेली ट्रॅफिक व्यवस्था या मुद्द्यांवर काँग्रेस पक्षाच्या वतीने सोमवारी (दि. ९ फेब्रुवारी २०२६) पोलिस आयुक्तांची भेट घेण्यात आली. अमरावती महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित १५ नगरसेवकांनी ही भेट घेतली.या वेळी अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. बबलु शेखावत, काँग्रेस गटनेते श्री. विलास इंगोले, माजी महापौर श्री. मिलिंद चिमोटे यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते. शहरात एम.डी. ड्रग्सचा युवकांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापर सुरू असून, त्यामुळे त्यांच्या आरोग्य, शिक्षण व भविष्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. या अवैध व्यवसायात सहभागी असलेल्या गुन्हेगारांवर तात्काळ व कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.तसेच गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्रीमुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून, आरोग्याच्या समस्या वाढत असल्याने संबंधित व्यापारी व विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली.शहरातील ट्रॅफिक व्यवस्थेबाबतही तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. सिग्नल तोडणे, नियमांचे उल्लंघन आणि नियंत्रणातील शिथिलतेमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याने तातडीने प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, असे निवेदन पोलिस आयुक्तांना देण्यात आले.या भेटीद्वारे शहरातील कायदा व सुव्यवस्था, युवकांचे भविष्य आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी त्वरित पावले उचलावीत, अशी विनंती करण्यात आली. या समस्या सुटाव्यात यासाठी काँग्रेस पक्ष सातत्याने प्रयत्नशील राहील व आवश्यकतेनुसार पुढील आंदोलने करेल, असे यावेळी सांगण्यात आले.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न देण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९तिवसा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा, या मागणीसाठी तिवसा तालुक्यातील गुरुदेव भक्तांनी एकत्र येत एल्गार पुकारला. मोठ्या संख्येने उपस्थित गुरुदेव भक्तांनी तहसीलदारांमार्फत देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान व राज्यपाल यांना निवेदन पाठवले. महाराष्ट्रातील थोर महापुरुषांचे देशाच्या जडणघडणीत अतुलनीय योगदान असूनही त्यांना अद्याप भारतरत्नाने गौरवण्यात आलेले नाही, ही खंत निवेदनात व्यक्त करण्यात आली.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. ग्रामगीतेच्या माध्यमातून ग्रामविकास, स्वच्छता, समाजसुधारणा, राष्ट्रभक्ती व विश्वशांतीचा संदेश दिला. जातीभेद, अस्पृश्यता व अंधश्रद्धेविरोधात त्यांनी आयुष्यभर लढा दिला. जपानमधील जागतिक धर्म व विश्वशांती परिषदेत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले.यासोबतच गाडगेबाबा, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, अण्णा भाऊ साठे व पंजाबराव देशमुख यांनाही भारतरत्न देण्याची मागणी करण्यात आली. हा लढा गावोगावी स्वाक्षरी अभियानाद्वारे अधिक तीव्र केला जाणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी सांगितले.




आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत